प्रकरण दुसरे

# वस्तीगृहाची स्थापना, विकास व वाद

## प्रकरण दुसरे

# वसतिगृहाची स्थापना, विकास व वाढ

छत्रपती शाहू महाराज यांनी विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतिगृहे कोल्हापूर शहरात स्थापन करण्याची एक अभिनव व वैशिष्ट्यपूर्ण मोहिम सुरू करून शिक्षणक्षेत्रात अद्वितीय स्वरूपाचे विधायक कार्य केले ते आपल्या या कार्याबद्दल नेहमीच अभिमानाने म्हणत, "इंग्लंडचे पार्लमेंट हे जसे सर्व पार्लमेंटची जननी आहे तसेच कोल्हापूरातील बोर्डिंग हाऊसेस ही विद्यार्थी बोर्डिंग हौसेसची जननी आहे. १९०१ ते १९२२ या कालखंडात व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग-१९०६, वीरशैव लिंगायत बोर्डिंग-१९०७, मिस क्लार्क-१९०८, दैवज्ञ बोर्डिंग-१९०८, नामदेव बोर्डिंग-१९११, कायस्थ प्रभु बोर्डिंग-१९१२, पांचाळ ब्राह्मण बोर्डिंग-१९१२, सारस्वत बोर्डिंग-१९१२, इंडियन ख्रिश्चन हॉटेल १९१५, आर्य समाज गुरूकूल-१९१८, वैश्य बोर्डिंग-१९१८, ढोर-चांभार बोर्डिंग-१९१९, शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग-१९२०, प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग-१९२०, सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डींग १९२०, सुतार बोर्डिंग १९२१, नाभिक बोर्डिंग १९२१, देवांग बोर्डिंग १९२१ ही बोर्डींग सुरू करून त्यांच्यामध्ये जातीनिहाय भावना राहू नयेत म्हणून त्यांना शेजारी-शेजारी जागा दिल्या. त्यामुळे दसरा चौकाच्या परिसरात एक व गंगावेशीकडून रंकाळावेशीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक अशा दोन वसाहती बोर्डिंग हौसेसच्या माध्यमातून कोल्हापूरात निर्माण झाल्या यापैकी दिगंबर जैन बोर्डिंगला त्यांनी दसरा चौकात जागा देऊ केली.[१]

## १) दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर :

१९०० मध्ये छ. शाहूंनी हिराचंद गुमानजी जैन बोर्डिंगला भेट दिली असताना तेथे असणाऱ्या कोल्हापूरातील विद्यार्थी आ.बा. लठ्ठे, आ. फ. चौगुले यांचा जवळून परिचय झाला होता. आंग्ल शिक्षित तरुण पिढीच शिक्षणाचे हे कार्य तळागाळात पोहचवेल ही आशा छत्रपती शाहू यांना होती. त्यामुळे शेठ माणिकचंद यांना भेटल्यानंतर त्यांच्या आर्थिक मदतीने कोल्हापूरात असे एखादे जैन बोर्डिंग सुरू करावे असे छ. शाहूंना वाटत होते. १९०२ ला सुरू झालेल्या जैन वस्तीगृहाला स्वतःची जागा असावी या इच्छेने श्री लठ्ठे आणि निटवेशास्त्री यांनी हिराचंद जव्हेरींना शाहूंनी केलेल्या विनंतीची आठवण करून दिली आणि शेडजीनी कोल्हापूरात यावेळी असा आग्रह धरला की, वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची जैन मंदिरात गैरसोय होत असे. त्यामुळे व्हिक्टोरिया मराठा वस्तीगृहासमोरील जैन साधूंच्या निषिधिंनी पवित्र असलेली चौफाळ्याचा माळ ही जागा जैन बोर्डिंगसाठी देण्याची मागणी जैन सभेच्या कार्यकर्त्यांनी केली. त्यासाठी शेठ माणिकचंद हिराचंद यांच्यामध्ये व छत्रपती शाहू यांच्यामध्ये जैनसभेच्या कार्यकर्त्यांनी मध्यस्थी केली. पं. कल्लाप्पा निटवे, आण्णाप्पा चौगले, शेठ माणिकचंद हिराचंद यांनी छत्रपतीशी झालेल्या चर्चेनंतर या जागेचा मागणी अर्ज छत्रपतींना देऊन त्यावर जागा दिल्याचा शेरा घेतला. ही जागा जैन बोर्डिंगला दिल्यास मराठा बोर्डींगच्या विस्ताराचा प्रश्न निर्माण होईल म्हणून मराठा बोर्डिंगच्या कार्यकर्त्यांनी त्यास विरोध केला. अर्थात छत्रपती शाहूंनी पर्खडपणे सुनावले. मी केवळ मराठ्याचा राजा नाही सर्व जणांचा राजा आहे तरीही या जागेवर आपला अधिकार रहावा असे मराठा बोर्डिंगच्या कार्यकर्त्यांना वाटत होते. त्यांनी 'या जागेवर बोर्डिंग झाल्यास ते रेसीडेन्ट साहेबांच्या येण्याजाण्यास त्रासदायक होईल.' असे सांगण्यास सुरवात केली. मराठा समाजाने ही जागा जैन समाजाला मिळू नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यामुळे सदर वसतिगृहाचा १९०४

मधील नियोजित पायाभरणीचा समारंभ पुढे गेला. छ. शाहूंनी १६ जून १९०४ ला राजनैतिक प्रतिनिधींना पत्र लिहले. ''जैन लोक आपल्या जातीच्या विद्यार्थ्यांकरिता एक वसतिगृह बांधत आहेत. हे पाहून आपणास आनंद वाटल्याशिवाय राहणार नाही. मराठा वसतिगृहासमोरील व वृद्ध डॉक्टर सिंकलेअर यांच्या निवासस्थाना नजीकची जागा मी जैन वसतिगृहासाठी दान दिली आहे. यासंबंधी येथील काही लोकांकडून आपल्याकडे तक्रार येण्याचा संभव आहे. परंतू ही तक्रार पोकळ आहे. भ्रामक आहे एका विशिष्ट जातीचे वर्चस्व टिकविण्यासाठीच ही तक्रार असल्यामुळे जैन जातीला प्रोत्साहन देणे मला इष्ट वाटते.''[२]

शाहूंच्या ठाम पावित्र्यामुळे चौफाळ्याचा माळ ही जागा बोर्डिंगसाठी देण्याचे दरबारने निश्चित केले. मुंबईचे माणिकचंद व हिराचंद यांच्याशी या काळात छत्रपती शाहू महाराजांचे संबंध अगदी दृढ झाले होते. दोघेही अगदी विचाराने व वृत्तीने दानशूर होते. महाराजांनी जैन समाजासाठी एवढा मोठा निर्णय घेतल्याने आपणही कोल्हापूर भागातील विद्यार्थ्यांच्यासाठी इमारत बांधून द्यावी हा विचार माणिकचंद शेडजींनी मनाशी पक्का केला. १९०४ साली छत्रपती शाहू महाराज आपल्या विलायत भेटीनंतर मुंबईस उतरले त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी सभेतर्फे सर्वश्री मालगांवे, हंज्जे, बुगटे, श्री लठ्ठे ही मंडळी हजर होती. त्यांनी शेठ माणिकचंद हिराचंद यांच्या रत्नाकर पॅलेस या निवासस्थानी शाहू महाराजाचा स्वागत समारंभ आयोजित केला. श्री लठ्ठे यांनी छत्रपतींचा गुणगौरव दाखविण्यासाठी भाषण केले. उत्तरादाखल शेडजींनी कोल्हापुरात लवकर यावे अशी विनंती केली. १९०४ मध्ये शेडजी व्यापाराच्या निमित्ताने कोल्हापुरात बराच काळ कोल्हापूरा राहिले व त्यांनी स्वत:च्या आर्थिक सहाय्याने कोल्हापुरात जैन बोर्डिंग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अतिशय बिकट परिस्थितीत जैन समाजाला बोर्डिंग बांधण्यासाठी ही जागा मिळाली असल्याने फार वेळ न घालविता मुंबईचे जैन बोर्डिंग बांधणारा मेस्त्री श्री लालुभाई याला शेडजींनी कोल्हापूरला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पाठवून पूर्वतयारी केली १५ ऑगस्ट १९०४ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या शुभ हस्ते या वसतिगृहाचा पायाभरणी समारंभ संपन्न झाला.[३]

पायाभरणी समारंभानंतर लगेचच बांधकाम सुरवात झाल्याने शाहू महाराजांनी संस्थानच्या तुरुंगातील कैदी मजूर म्हणून कामाला पाठवले. इमारतीला लागणारा दगड खाणीतून काढण्याचे मोफत पुरविण्याची आज्ञा दिली. काम पूर्ण होईपर्यंत हे कैदी बांधकामावर होते. माणिकचंद शेडजीनी आवश्यक दारे, खिडक्या, चौकटी मुंबई बोर्डिंग सारखी तयार करून कोल्हापूरला पाठविली त्यामुळे त्या काळातील कोल्हापुरातील ही प्रेक्षणिय इमारत समजली जाई. यासाठी शेडजीनी २२,००० इ. खर्च केले व २४ खोल्यांची सुंदर इमारत द. भारत जैन सभेला विद्यार्थी वसतिगृहासाठी सुपूर्त केली. या वास्तूला एकूण ५०,००० रुपयांपर्यंत खर्च आला. या वास्तूचे उद्घाटन ९ ऑगस्ट १९०५ रोजी छत्रपती शाहूंच्या हस्ते करण्यात आले. या समारंभास मुंबई येथून शेठ माणिकचंद व त्यांचे कुटुंबियाला शेठ रामचंद्र गांधी, शेठ ठाकोरदास जव्हेरी, सोलापूरहून शेठ हिराचंद नेमचंद, शेठ वालचंद रामचंद (हरिभाई देवकरण), पंढरपूरहून नानचंद परमचंद व श्री पलसे, बेळगांवहून श्री आण्णाप्पा चौगुले, अवलक्की, लेगडे, मोहिरे ही मान्यवर मंडळी तसेच कोल्हापूर व सांगलीच्या भागातून सर्व प्रमुख जैन मंडळी तसेच पोलिटिकल एजंट कर्नल फेरिस दरबारचा अधिकारी वर्ग व मोठा जनसमूदाय उपस्थित होता.[४]

द. भारत जैन सभेच्या विद्या विभागाचे प्रमुख म्हणून श्री लट्ठे यांनी उद्घाटन प्रसंगीचे स्वागतपर भाषण केले. ते म्हणाले,[५]

''सुमारे एकच वर्षापूर्वी मी दक्षिण महाराष्ट्र जैन सभेच्या वतीने महाराजांना ज्या इमारतीचा पाया घालण्याची विनंती केली होती ती आज बहुतेक पूर्ण झाली.... आमच्या सभेची मालमत्ता सुमारे ६५ हजाराची असून त्यापैकी १८ हजाराहून अधिक इमारतीचा खर्च

आला आहे. १० हजार रोख जमले आहेत. १४०० च्या दोन जमिनी सभेला मिळाल्या असून सुमारे १४०० ची पुस्तके वगैरे सभेकडे आहेत. उरलेली रक्कमही हळूहळू वसूल होत आहेच. मराराजांचा आश्रय, शेठ माणिकचंद यांचे सारख्याचे औदार्य आणि आमच्या समाजातील अनेक साधने यांच्या सहाय्याने याबाबत आम्हास कोणतीही काळजी दूर करता येईल. फक्त आम्हास जपावयाचे इतकेच की आमचे हेतू लोकोपयोगी असावे आणि आमचे प्रश्न चूकीचे नसावेत... ज्या कारणामुळे आमची हल्लीची समाज स्थिती निर्माण झाली आहे आणि अशारितीने जातीना (शिक्षणात) विशेष सवलती देणे यात जर जातीद्वेष असेल तर हा दोषारोप आम्ही आनंदाने कबुल करू. याकरिता मला आशा आहे. की आमच्या जाती जातीतील घासाघास कमी होऊन सुधारलेल्या जातीची मागासलेल्या जातीना मदत व सहानभूती लवकरच मिळू लागेल."

इतर जातीशी जैन समाजाची तुलना करीत असताना ते म्हणतात "ज्या जूटीने मूसलमानानी स्वत:चे विश्वविद्यालय (अलिगढ) स्थापण्यापर्यंत मजल मारली तिचा उपयोग जैन लोक अद्याप शिकले नाहीत... पांगूळ गाड्याचा उपयोग चालता येत नाही तोपर्यंत ठीक आहे पण पुढे इतर सर्व लोकांबरोबर बरोबरीच्या नात्याने शर्यत मारण्याकरिता सवलतीच्या मदतीने आपण तयार झाले पाहिजे तरच सवलती देण्याचे सार्थक होईल आणि आपले चिरकाल हित साधले जाईल.

"उद्धाराची ही आशा हिच आजच्या आमच्या आनंदाला कारण आहे. महाराज आपण जी इमारत आता उघडणार आहात तिचे महत्त्व तिच्या बाह्य सौंदर्यात आहे. असे नाही याचे कारण असे आहे की याच ठिकाणाहून जैन धर्माने शिकविलेल्या मानवी थोरपणाचा अनुभव उत्तमप्रकारे घेण्यास आमच्या तरुणांची मने तयार होतील; आणि याच ठिकाणाहून होतकरू डॉक्टर, कायदेपंडित, इंजिनिअर आणि मुत्सदी इतकेच नव्हे तर कर्तबगार व्यापारी

व कर्तव्यदक्ष शेतकरी आमच्या समाजात तयार होऊन ते प्राचीन काळचे वैभव पुन्हा मिळवतील अशी आज आम्हास उमेद वाटते. आजचा दिवस अशा कार्याच्या प्रारंभीचा आहे म्हणून तो उजाडण्यास कारण जाहलेल्या उष:कालच्या नक्षत्राची आठवण सदोदित ताजी राहील दरसाल ३०० रुपयाची नेमणूक, २००० रुपयांची फंडास देणगी व प्रत्येक वर्गात एक फ्रिशिप याप्रमाणे देणग्या देऊन, महाराज आपण आमच्या समाजाला निरंतर अत्यंत ऋणी करून ठेविल आहे''

आण्णासाहेब लठ्ठे हे या बोर्डिंगचे पहिले अधिक्षक होते. (१९०५-१९१४) त्यांनी जैन समाजाची प्राचीन काळची स्थिती त्यानंतर मध्ययुगामध्ये झालेली शैक्षणिक अवनिती आणि ब्रिटीश आगमनानंतर मागासलेला जैन समाज यांचा आढावा घेऊन छत्रपती शाहू महाराजांनी जैन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शेठ माणिकचंद यांच्या दातृत्वाचा ओघ दक्षिण भारत जैन सभेकडे सुरू झाल्याने मुंबईसारखी शैक्षणिक प्रगती या भागातील जैन समजाचीही होईल हा आशावादही व्यक्त केला.

या भाषणाला तितक्याच समर्थपणे छ. शाहूंनी उत्तर दिले. त्यामध्ये प्राचीन वैभवाला मूकलेली जैन मंडळी पुन्हा या विद्यार्थी वसतीगृहाच्या सहाय्याने आपले गतवैभव मिळवतील याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला ते म्हणतात, ''जैन लोक अशा रितीने प्राचीन काळी वैभव भोगून हल्ली सुद्धा ते गतवैभव प्राप्त करून घेण्यास बरेच दिवसांपासून उद्युक्त झाले आहेत व तदर्थ त्यांनी आपला सगळा आळस टाकून दिला आहे.''

''अतिप्राचीन काळापासून ब्राह्मणेत्तर वर्ग बौद्धीक व सामाजिक गुलामगिरीच्या पाशात गुरफटून गेला आहे. ते पाश तोडून टाकायास सुरवात झाली आहे त्याचे हे सूचिन्ह आहे हा ब्रिटीश राजवटीचा परिणाम होय. आमचा पाश्चात्य राष्ट्राशी संबंध जडल्यामुळे जे सुपरिणाम घडत आहेत ते जातीच्या स्वोन्नती प्रित्यर्थ चाललेल्या प्रयत्नांत जसे स्पष्टपणे

दिसून येतात तसे ते इतर ठिकाणी दिसून येत नाहीत जनतेच्या आंतरिक जागृतीची सुखद चिन्हे आम्हास दिसून येते आहेत. क्षत्रिय, शेतकरी विविध व्यावसायिक व व्यापारी वर्ग ह्या सर्वांना आपआपल्या जातीमध्ये शिक्षणप्रसार करण्याचे महत्त्व समजून चुकले आहे.

"या लहानशा शहरी मराठ्यांच्या व जैनांच्या संस्था शेजारी असल्याचे पाहून मला मोठे समाधान वाटते. प्रेमविनिमयाने व परस्परसहकाराने हे दोन्ही समाज हातात हात घालून उन्नतीचा पथ आक्रमणातील असा मला भरवसा आहे. या संस्था स्थापन करण्याच्या क्षेत्रात जरी मला फारसे भागिदार होता आले नाही तर ह्या संस्थांची व त्यामागील संचालक शक्तींना शक्य तेवढे प्रोत्साहन देणे हे माझे ब्रिद आहे. आतापर्यंत आमच्या प्रयत्नाचे जे परिणाम दिसून आले. ते जरी अल्प असले तरी अभिमानास्पद आहेत. असे जर मी म्हटले तर त्याबद्दल तुम्ही मला क्षमा कराल असा विश्वास वाटतो."[६]

संस्थेबद्दल अपेक्षा व्यक्त करताना छ. शाहू पुढे म्हणाले, "या संस्थेतून निष्णात डॉक्टर, वकील, इंजिनिअर, राजकारणी पुरूष इत्यादीप्रमाणेच सांप्रत थकवलेली अथवा लुप्त झालेली प्राचीन वैभवशाली परंपरा व इतिहास यांचा ओघ पुढे चालू ठेवणारे बुद्धीमान व्यापारी आणि कुशल शेतकरी निर्माण करू, अशी जी जिद्द तुम्ही बाळगली आहे. ती पाहून मला अतिव संतोष वाटतो. तुमच्या आशा आकांक्षाचे स्पष्टतम प्रतिबिंब मला दिसत आहे सर्व मागासलेल्या समाजाच्या प्रगतीच्या मार्गात जसे अगणित अडथळे आढळून येतात, तसेच तुमच्याही प्रगतीच्या मार्गात आहेत. स्वतःचा उद्धार स्वतःच करून घेण्याच्या तुमच्या प्रयत्नात प्रारंभी तरी बाह्य मदतीची अतिशय गरज असते याची जाणीव मला आहे. स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य अंगी येताच बाह्य मदतीच हा पांगूळ गाडा फेकून देण्याचा तुमचा निर्धार प्रशंसनीय आहे."[७] या बोर्डींगचा व्यवस्थापनाचा सर्व खर्च सुरवातीच्या काळात धनिक जैन लोकांनी दिलेल्या मदतीवरच चालू होता. १९०५-०६ साली असा

शिक्षण फंड १,७५,००० द. भा. जैन सभेने जमा केला तर ३०० रुपये छत्रपती शाहूंनी या संस्थेला मदत म्हणून दिली.[८] १९०६-०७ ला ४३ विद्यार्थी या वस्तीगृहात रहात होते. त्यापैकी १० पूर्ण फी देत होते. ४ अर्धी फी देत होते आणि २९ विद्यार्थ्यांना पूर्ण फी माफी होती त्यापैकी ३३ हे राजाराम हायस्कुल मध्ये शिक्षण घेत होते तर उरलेली मुले संस्कृत जैन विद्यालयात शिकत होती. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी २१ जण परीक्षेला बसली. २० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर त्यातील एकाने कोल्हापूर संस्थानची स्कॉलरशीप मिळवली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ग्रंथालय हा या बोर्डिंगचा आत्मा होता. १९०६-०७ ला ११०४ पुस्तके या ग्रंथालयात होती त्यापैकी इंग्रजी ३९२ मराठी ३४३ धार्मिक ३०१, कायद्याची पुस्तके ६८ होती. आण्णासाहेब लट्ठेनी स्वत: या ग्रंथासाठी १००० रुपयांची पुस्तके आपल्या वडिलांच्या नावाने दान दिली. या ग्रंथालयातील पुस्तकांचे अतिशय व्यवस्थित रजिस्टर तयार केले गेले. त्यामध्ये इतिहास, भूगोल, गणित, सायन्स या विषयाची अनेक पुस्तके मागविली गेली. विद्यार्थ्यांना दिली जाणारी पुस्तके व्यवस्थितपणे नोंदही सांभाळली.[९]

१९०७ मध्ये कोल्हापूर संस्थानकडून या वसतिगृह सभागृह बांधण्यासाठी जागा मिळाली. त्यावर शेठ माणिकचंद हिराचंद यांनी आपली पत्नी चतुराबाई हिच्या नावे १९१० मध्ये ३५०० रु खर्च करून सभागृह बांधून दिले. त्याचा उद्‌घाटन समारंभ श्रीमंत छ. युवराज राजाराम महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.[१०] हे सभागृह फक्त या बोर्डींगचेच नव्हे तर द. भारत जैन सभेच्या १०० वर्षाच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळीचे प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून उभे आहे. कारण या सभागृहामध्येच आजपर्यंतचे सर्व कार्यक्रम घडवून आणले गेले आहेत. १९८६ मध्ये या हॉलच्या नुतनीकरनासाठी ४०,००० रुपये बोर्डिंग

व्यवस्थापनाने खर्च केला तसेच तेथे लाऊडस्पिकर, टेप, ॲप्लीपायर व दृकश्राव्य साधनासाठी ६,१०० रु. खर्च केले त्यामुळे धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम प्रार्थना सभा व व्याख्याने यासाठी या गोष्टीची फार मोठी सोय झाली. चतुराबाई हॉल शेजारचे भोजनालय हे या बोर्डिंगचे आणखी एक वैशिष्ट्य अगदी सुरूवातीच्या काळात बांधलेले हे भोजनालय आजही विद्यार्थ्यांना चांगले अन्न मिळावे यासाठी कार्यरत असते बाहेरच्या जेवणापेक्षा येथील जेवण सात्विक, शाकाहारी, चांगले व कमी पैशात विद्यार्थ्यांना पुरविले जाते.[११]

सुरवातीच्या कालखंडात मान्यवरांना बोलवून आपल्या कार्याची प्रगती दाखविण्याचे धोरण दक्षिण भारत जैन सभेने ठेवली होते. बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचा ४/५/१९०९ रोजी दक्षिण भारत जैन सभेने सन्मान केला होता. त्यावेळी सन्मानाला उत्तर देताना ते म्हणाले, ''शिक्षणाविषयी हल्ली आपण जे प्रयत्न कले आहेत ते फार वाढले पाहिजेत. माझ्या प्रजेला मी सक्तीचे शिक्षण दिले आहे. एवढ्याने माझे समाधान होत नाही. शिक्षण पुष्कळ वाढले पाहिजे या कार्यास सर्वांनी मदत केली पाहिजे आपल्यातील दुष्ट रुढी काढून टाकल्या पाहिजेत. त्या जुन्या म्हणून त्यास चिकटून रहाणे फार तोट्याचे आहे. आपल्या विवेक शक्तीस हे शोभत नाही; हा माझा उपदेश आपण घ्यावा अशी मी विनंती करतो.''[१२] याप्रमाणे सयाजीराव गायकवाडसारख्या शैक्षणिक बाबतीत वेगळेपण प्रयोग आपल्या बडोदा राज्यात करणाऱ्या छत्रपतींना बोलावून त्यांच्याकडून द. भा. सभा अंतर्गत चाललेल्या शै. प्रयोगांना मार्गदर्शन मिळवण्याचे काम सभेच्या कार्यकर्त्यांनी केलेले दिसून येते.

१९०५-१४ या काळात आण्णासाहेब लट्ठे या बोर्डिंगचे अधिक्षक म्हणून काम पाहत होते याच काळात कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची चळवळ इतर बोर्डींग हौसेसची स्थापना यांचे कार्य चालू होते त्यामुळे छ. शाहूंचे शिक्षणविषयक आणि सामाजिक कार्यात

मदत करणारे सल्लागार भास्करराव जाधव, महादेव डोंगरे आण्णासाहेब लठ्ठे यांना बोर्डिंगच्या कामात सहकार्य करीत असत.[१३] आ. लठ्ठे हे राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापक १९०७-११ व कोल्हापूर संस्थानचे एज्यूकेशन इन्स्पेक्टर असल्याने संस्थानच्या शिक्षणविषयक सर्व सुविधा मिळणाऱ्या स्कॉलरशिप यांचा फायदा त्यांनी जैन वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मिळवून दिला.[१४]

विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच इतर विषयाचे ज्ञान व्हावे यासाठी दक्षिण भारत जैन सभेने कोल्हापूर जैन बोर्डिंगमध्ये शेतकी आणि औद्योगिक प्रदर्शन ४ मे १९०९ रोजी भरवले होते. कारण या विद्यार्थी वस्तीगृहातून येणारे विद्यार्थी हे ग्रामीण भागातील शेतकरी वर्गातूनच आले होते. हे प्रदर्शन सर्व लोकांसाठी खुले ठेवून त्यांनाही शेतातील आधुनिक औद्योगिक घडामोडी यांचा परिचय करून घेणे हा या मागील उद्देश होता. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना मि. मॅकॅन्झीमूर यांनी जैनांबद्दल अतिशय महत्त्वपूर्ण उद्‌गार काढले. ते म्हणाले, ''जैन लोक हुशार आहेत व निदान व्यवस्थितपणे निटनेटकी शेती करण्याच्या कामात कुणबी जातीच्या शेतकऱ्यांच्या पुढे आहेत मी सातारा जिल्ह्यात काम करीत असताना या दोन जातीच्या लोकांनी केलेल्या शेतीतील फरक माझ्या निदर्शनास आला. अतिशय मोठ्या शेतीवर अव्यवस्थित शेती करण्यापेक्षा लहान शेतावर काळजीने नीटनेटकी शेती केली तर याचा फायदा होतो हे जैन शेतकऱ्याला फारच चांगले कळते.१५ अशा प्रकारचे विविध उपक्रम विद्यार्थ्यापुढे ठेऊन या काळात विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच त्यांच्या भावी आयुष्याकरिता वेगवेगळ्या गोष्टीचे व्यावहारिक ज्ञान देण्याचा प्रयत्न या विद्यार्थी वसतिगृहातून केला.

या बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांनाही महत्त्व दिले गेले. राजाराम कॉलेजमध्ये शिकणारे दोन विद्यार्थी या वसतिगृहातील दोन विद्यार्थी १९१२-१३ मध्ये

संस्थानची स्कॉलरशीप मिळवून इटली येथे ड्रॉईंग व कला यांच्या प्रशिक्षणासाठी गेले. छ. शाहू व दरबार यांचे या वस्तीगृहाकडे बारकाईने लक्ष असल्याने वसतीगृहाची वाढ व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचाही प्रयत्न केला गेला.[१६] या काळात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून सुपरिडेंटचे निवासस्थान बांधून पूर्ण केले तर तवनाप्पा आत्माराम पाटणे यांनी श्री नेमाण्णा चाळेकर यांच्या स्मरणार्थ पाण्याचा हौद व भोजनगृहाची सोय करून दिली.

१९१४ साली कोल्हापूरात 'डांबर प्रकरण' घडून आले. या 'बोर्डिंगचे अधिक्षक लट्ठे यांना यात गोवण्यात आले. त्यामुळे लट्ठे कोल्हापूर सोडून बेळगावला स्थायीक झाले. त्यामुळे १९१८ सालापर्यंत या बोर्डिंगच्या विकासाची गती काहीशी मंदावली. या काळात विद्यार्थ्यांनी या बोर्डिंगमध्ये राहण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देणे व्यवस्थापनाला शक्य होईना; १९८१ च्या प्लेगच्या साथीत दक्षिण भारत जैन सभेचे काही कार्यकर्ते बोर्डिंगच्या आवारात राहिले होते त्यांच्या व कोल्हापुरच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून या बोर्डिंगसाठी एक दुमजली इमारतही बांधली. या इमारतीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट हे की विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी स्वत:च्या प्रयत्नानेही बांधली त्यामुळे त्यांचे नाव 'सांगली ब्लॉक' असेच ठेवले.[१७] ही इमारत पुढील वीस वर्षात कमी पडू लागली. १९४६ सभेचे अधिवेशन याच बोर्डिंगमध्ये घेण्याचे ठरले त्यामुळे सोळा खोल्यांच्या एक ब्लॉक बांधण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आणि प्रत्येक खोली करित अंदाजे २०००/- रु देणगी देऊन त्या देणगीदाराच्या नावाने खोली बांधावी असे ठरले. लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे लगेच कार्यवाहीत आणण्यात आली. आणि फेब्रुवारी १९४६ मध्ये प्रत्यक्ष बांधकामास सुरवात झाली. सभेच्या अधिवेशनाच्या दिवशी म्हणजे दि. २७/४/१९४६ रोजी सभेचे अग्रगण्य नेते श्री आण्णासाहेब लट्ठे यांच्या हस्ते व हजारो लोकांच्या उपस्थितांत या इमारतीचा कोनशिला समारंभ करण्यात आला. पुढील तीन वर्षात सुमारे ४,५००/- रु. खर्च

करून इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. तसेच संडास व इतर सोयीकरिता आणखी ३०००/- रु खर्च करण्यात आले.

१९६३ मध्ये श्रीमा शेठ शाहू शांतीप्रसाद जैन यांनी कोल्हापूर वसतिगृहाला भेट दिली. त्यांच्या भेटीची स्मृती चिरंतन रहावी म्हणून वसतिगृहाच्या इमारतीच्या एका दुमजली विभागाला शांतीनिलय असे नामाभिधान देणेत आले. श्रीमान शेठजींनी या प्रसंगाची आठवण म्हणून रु. ४,०००/- उदार देणगी द. भा. जैन सभेला दिली. सभेने ही रक्कम कोल्हापूर जैन वस्तीगृहाच्या विकासाकरिता दिली. या रक्कमेमधून 'शांतीनिलय' या इमारतीवर आणखी काही खोल्या बांधणेचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.[१८]

१९६५ साली दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूरला ६० वर्ष पूर्ण झाली त्याचा हिरक महोत्सव साजरा करावा व त्यासाठी द. भारत जैन सभेचे अधिवेशन कोल्हापुरला घ्यावे असे ठरले त्यावेळी नव्या १४ खोल्यांचे बांधकाम चालू होते. त्यामुळे ठरल्याप्रमाणे या इमारतीला 'हिरकमहोत्सवी इमारत' असे नाव देण्यात आले.

**बोर्डिंगची व्यायामशाळा :**

१९०९ मध्ये विद्यार्थ्यांना खेळाच्या सुविधा असाव्यात व त्यातून शारिरीक शिक्षण मिळावे यासाठी बोर्डिंगच्या आवारात जिम्नॅशियमची सुरूवात केली होती. याचा फायदा नेहमीच विद्यार्थ्यांच्या शारिरीक वाढीसाठी शाळा, कॉलेजमधील खेळांच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन प्राविण्य मिळविण्यासाठी होत असे. दरवर्षीच्या बोर्डिंगच्या स्नेहसंमेलनामध्ये विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धा आयोजित कडून विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन प्रोत्साहन दिले जात असे ही परंपरा १०० वर्ष या बोर्डिंगमध्ये चालू आहे.

१९७६ मध्ये बोर्डिंगचे संचालक तात्या पाटणे, दादोबा चौगुले यांनी १०,००० रु खर्च करून यांनी व्यायामशाळेचे नुतनीकरण केले व आधुनिक व्यायामसाधने बोर्डिंगमध्ये

खरेदी करण्यात आली. तात्या पाटणे यांनी शाहूपुरी जिमखाना, शिवाजी स्टेडियम कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या कार्यकारणीवर विविध पदे भूषविल्यामुळे जैन बोर्डिंग विद्यार्थी शरीर सौष्ठव व खेळ यामध्ये मागे राहू नयेत या इच्छेनेच त्यांनी व्यायामशाळा उभी केली. व्यायामशाळामध्ये कुस्ती व इतर व्यायामासाठी १० ते ६० विद्यार्थी सहभागी होते. ७/३/१९७६ ला तालिम मास्तर महाराष्ट्र सॅण्डो श्री बिभिषण पाटील यांनी व्यायामाची व शरीरसौष्टाची अनेक प्रात्यक्षिके विद्यार्थ्यासाठी सादर केली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मिरजेचा पैलवान चारूदत्त पाटील यांनाही पाचारण केले गेले याबद्दल ते लिहतात.''

''ज्ञान संपादनाबरोबर शारिरीक विकास होऊन अनेक ठिकाणची क्रिडांगणे विद्यार्थी जेव्हा गाजवतील तेव्हाच ते 'जय बाहुबली' म्हणण्यास पात्र ठरतील या विद्यार्थी वस्तीगृहातून बल संपन्न विद्यार्थी बाहेर पडोत व भारताच्या बांधणीसाठी आणि संवर्धनासाठी प्रयत्नशील राहोत ही सदिच्छा. कोल्हापुरातील जैन बोर्डिंगची व्यायामशाळा ही उत्कृष्ट व्यायामशाळा आहे.''[११]

जैन बोर्डिंगच्या इमारतीचा विस्तार विद्यार्थी वाढीबरोबर समाधानकारकपणे वाढला असला तरी अभ्यासिका व ग्रंथालय यांची उणीव कोल्हापूर जैन बोर्डिंगच्या आवारात जाणवत होती. स्व. डॉ. ए. एन उपाध्ये यांनी जैन संशोधनाचे प्रचंड कार्य केले होते. जैन बोर्डिंगच्या विकासात व व्यवस्थापनात त्यांचा सहभाग होता. त्यांच्या कार्याचे स्मरण रहावे यासाठी ए.एन. उपाध्ये स्मृती ग्रंथालय बांधण्याचे बोर्डिंगच्या व्यवस्थापणाने ठरविले. त्यासाठी जवळ जवळ ६ लाख ५० हजार पर्यंत खर्च वेगवेगळ्या मार्गांनी दानरूपात गोळा केला. तात्या पाटणे यांच्या विशेषांकातील जाहिरातीतून मिळालेला पैसा या स्मृती इमारतीसाठी वापरण्यात आल्या. या इमारतीचा कोनशीला समारंभ टाईम्स ऑफ इंडिया ग्रुप

दिल्लीचे श्री साहू अशोककुमार जैन यांच्या हस्ते २५/७/१९८८ रोजी पार पाडला. त्यांनीही यासाठी ५०,०००/- रु ची देणगी देऊ केली.[२०] या ग्रंथालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामामुळे जुने ग्रंथालय व्यवस्थितपणे लावून एक उत्कृष्ट ग्रंथालय बोर्डिंगच्या व्यवस्थापणाने तयार केले. ज्यामध्ये दरवर्षी ५ ते १० हजार रुपयांच्या ग्रंथाची भर टाकली जाते. या वस्तीगृहामध्ये आर्टस् सायन्स, कॉमर्स, मेडिकल, इंजिनिअरिंग, स्पर्धा परीक्षांना बसणारे विद्यार्थी रहात असल्याने त्यांना आवश्यक असणारी महाग पुस्तके व संदर्भ ग्रंथ या ग्रंथालयात घेऊन अभ्यासिकेत पुरविली जातात. या अभ्यासिकेची, ग्रंथालयाची देखरेख व देवघेव व्यवहार पाहण्याचे काम कमवा व शिका या योजनेतील वसतिगृहातील विद्यार्थी करतात. याच आवारात जव्हेरी कुटुंबियांनी दिलेल्या देणगीने व मुदत ठेवीवरील कर्जामधून स्वर्गीय माणिकचंद हिराचंद जव्हेरी स्मृती भवनही उभारण्यात आले व नवीन १२ खोल्या बांधून १९९३ मध्ये त्याचे उद्घाटन परमपूज्य कर्मयोगी चारूकीर्ती महास्वामी श्रवणबेळगोळ यांच्या शुभ हस्ते २२/८/९३ रोजी पार पडले.[२१]

या बोर्डिंगला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने याचा अमृतमहोत्सव वर्ष ९ ऑगस्ट १९८० पासून पुढे एक वर्ष साजरा केला यादरम्यान माजी विद्यार्थी संघटना तयार केली या माजी विद्यार्थी संघटनेचे पहिले स्नेहसंमेलन १७ ऑगस्ट १९८६ ला प्रकाश शिवलाल शहा, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मुंबई यांच्या उपस्थितीत पार पडले. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मातृ संस्थेसाठी ५,००० ची देणगी जाहिर केली. या निमित्ताने विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षक देणे काळीजीची गरज आहे याची जाणीव पदाधिकाऱ्यांना झाली. यावर भाष्य करताना टि. पी. उपाध्ये यांनी लिहले.''[२२]

''सध्या बोर्डिंगमध्ये वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना धंदे शिक्षण देण्याची व्यवस्था करावी कारण नोकरी मिळवणे कठीण झाल्याने व्यावसायिक ज्ञानाने स्वतंत्र व्यवसाय करणे

शक्य होईल.'' या सूचनेनुसार व्यवसाय मार्गदर्शनाचे दोन दिवसांचे शिबिर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले.

या बोर्डिंगमधील विद्यार्थी वेगवेगळ्या विषयात प्राविण्य मिळवून म्हणून उच्च पदावर पोचले आहेत. यापैकी येथील एक विद्यार्थी डॉ. आदिनाथ शेरीकर हे पशूवैद्यकीय आणि मत्स्यविज्ञान विश्वविद्यालय नागपूर या महाराष्ट्र सरकारने नागपूर येथे सुरू केलेल्या विश्वविद्यालयाचे पहिले कुलगुरू म्हणून नियुक्त झाले आहेत. याच उदाहरणाप्रमाणे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रातून मान्यता पावले आहेत. येथील १२ वी च्या विद्यार्थ्यांच्यावर घेतलेल्या विशेष प्रयत्नामुळे १९८८ मध्ये श्री रविंद्र गोरे हा विद्यार्थी १२ वी सायन्समध्ये बोर्डात १७ वा, कोल्हापूर जिल्ह्यात ८ वा आला. शांत स्वभावाचा रविंद्र आपल्या यशाची गुरूकिल्ली सांगताना म्हणतो, ''नियमित अभ्यास आईवडिलांचे प्रोत्साहन जैन बोर्डिंगचे वातावरण येथील पदाधिकाऱ्यांचे सतत लक्ष व अभ्यासिकेची सोय हे माझ्या यशाचे गमक आहे.''[२३] अभ्यासाबरोबरच जैन बोर्डिंगमधील वार्षिक स्नेहसंमेलन एक उत्तम सांस्कृतिक कार्यक्रम असतो. क्रीडा, वक्तृत्व शरीर सौष्ठव व इतर आयोजित स्पर्धांचे पारितोषिक वितरण व वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन हे दरवर्षीच्या या समारंभाचे वैशिष्ट्य असते. सन १९८८ च्या स्नेहसंमेलनामध्ये एका गुणी व प्रामाणिक विद्यार्थ्यांचा सत्कार केला कारण त्याने १०००/- रु किंमतीचे बाथरूममध्ये सापडलेले घड्याळ अधिक्षकांकडे परत दिले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे म्हणाले, ''जीवनात इतर कोणत्याही पारितोषिकापेक्षा प्रामाणिकपणाचे व सशोटीचे पारितोषिक फार मोलाचे आहे. यशस्वी जीवनाला ते आकार देणारे आहे. प्रामाणिकपणा म्हणजेच बोर्डिंगमधल्या सहजीवनातून व संस्कारातून मिळणारा मूलमंत्र आहे. हे बोर्डिंग म्हणजे वेगवेगळ्या ठिकाणाहून येणाऱ्या मुलांची सहवास केंद्रे आहेत. जैन समाजात गुन्हेगारांचे प्रमाण कमी आहे. याचे मूळ हे बोर्डिंगसारख्या संस्कार केंद्रावर जाऊन पोहचते.

कोल्हापूर बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे. सन १९८६-८७ - २२० विद्यार्थी, १९८७-८८ - २५३ विद्यार्थी, १९८८-८९ - २६८ विद्यार्थी, ८९-९० - २१४ विद्यार्थी, १९९०-९१ - १७७ विद्यार्थी, ९१-९२ - १९५ विद्यार्थी, ९२-९३ - २१९ विद्यार्थी, ९३-९४ - २१६ विद्यार्थी, १९९४-९५ - २३४ विद्यार्थी, ९५-९६ - २५६ विद्यार्थी, ९६-९७ - २१० विद्यार्थी, ९७-९८ - २१६ विद्यार्थी, ९८-९९ - १९६ विद्यार्थी, ९९-२००० - २०७ विद्यार्थी, २०००-२००१ - २१५ विद्यार्थी, २००१-२००२ - १८२ विद्यार्थी, २००२-२००३ - १५६ विद्यार्थी, २००३-२००४ - १४८ विद्यार्थी, २००४-२००५ - १७३ विद्यार्थी, २००५-२००६ - १६० विद्यार्थी.[२४]

१९०६-०७ व १९०८-०९ या साली जैन बोर्डिंगमध्ये जवळजवळ सरासरी विद्यार्थी संख्या प्रत्येक वर्षी ४३ इतकी होती. या ती वर्षात त्यापैकी २४ फी देणारे तर १० अर्धी फी देणारे व ५४ जणांना पूर्ण फी माफी अशी सवलत बोर्डिंगतर्फे होती.[२५]

**दक्षिण भारत जैन सभा अंतर्गत बोर्डिंगमधील विद्यार्थी संख्या (१९१९-२०)**[२६]

| अ. क्र. | शाखा | कोल्हापूर | हुबळी | बेळगाव | सांगली | पुना | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इंटर | १ | - | - | ३ | - | ४ |
| २ | प्रेव्हीयस | २ | - | - | ३ | ४ | ९ |
| ३ | मॅट्रीक | ११ | ३ | ३ | ३ | ११ | ३१ |
| ४ | इंग्रजी VI | ५ | ७ | - | ३ | ७ | २२ |
| ५ | इंग्रजी V | ४ | १ | ३ | ५ | ४ | १६ |
| ६ | इंग्रजी IV | १२ | ६ | ५ | १ | ८ | ३२ |
| ७ | इंग्रजी III | ३ | २ | ४ | ५ | १० | २४ |
| ८ | इंग्रजी II | १ | ६ | ७ | १२ | ५ | ४१ |
| ९ | इंग्रजी I | ४ | ५ | ६ | १० | १ | २६ |
| १० | टेक्नीकल | - | - | - | - | १ | १ |
| ११ | मराठी VII | ४ | - | - | - | - | ४ |
| १२ | मराठी VI | १ | - | - | - | - | १ |
| १३ | मराठी V | - | - | - | - | - | - |
| | एकूण | ४८ | ३० | २५ | ४५ | ५१ | १९९ |

दक्षिण भारत जैन सभा अंतर्गत बोर्डिंगमधील विद्यार्थी संख्या (१९८३-८४)[२७]

| अ. क्र. | शाखा | कोल्हापूर | सांगली | बेळगाव | हुबळी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेडिकल | ५ | - | २९ | ६ | ४० |
| २ | इंजिनिअरींग | १३ | २ | ११ | ७ | ३३ |
| ३ | डिप्लोमा | ३५ | १ | १४ | ८ | ५८ |
| ४ | ॲग्रीकल्चर | ५ | - | - | - | ५ |
| ५ | सायन्स | ५४ | ५४ | ५ | १० | १२३ |
| ६ | कॉमर्स | ७२ | ३२ | ५ | ९ | ११८ |
| ७ | आर्टस् | ३४ | ४५ | २४ | २ | १०५ |
| ८ | हायस्कुल | २३ | १४ | १ | १ | ३९ |
| ९ | लॉ | ८ | ६ | - | ५ | १९ |
| १० | इतर कोर्सेस | १ | २ | - | ३ | ६ |
| | एकूण | २५० | १५६ | ८९ | ५१ | ५४६ |

त्याचप्रमाणे १९८५-२००० दक्षिण भारत जैन सभेच्या वसतिगृहातील विद्यार्थी संख्या सातत्याने वाढू लागलेली होती. साधारणपणे या १५ वर्षात ९,३९० इतके विद्यार्थी वसतिगृहामध्ये वास्तव्यास होते. यावरून या वसतिगृहातून ग्रामीण व शहरी भागातील अनेक विद्यार्थ्यांना उपयोग झाला हे सहज लक्षात येते.[२८]

## दिगंबर जैन बोर्डींग हुबळी :

कोल्हापूर जैन बोर्डींगची सुरवात ही छ. शाहूंच्या प्रेरणेने झाली होती. कोल्हापूरामध्ये इतर समाजासाठीसुद्धा वस्तीगृहे निघू लागली होती. द. भा. जैन सभेचे कार्य क्षेत्र व वार्षिक अधिवेशने भरण्याचे प्रमुख ठिकाण श्री क्षेत्र स्तवनिधी हे होते. विशाळी

अमावसेला होणाऱ्या प्रत्येक अधीवेशनात कर्नाटक महाराष्ट्रातील जैन समाज द.म.जै. सभेचे पदाधिकारी अगत्याने हजर राहत त्यावेळी होणाऱ्या चर्चेतून कोल्हापूर बोर्डिंगचे कार्य व कोल्हापुरातील वस्तीगृहाची चळवळ यांची माहिती कर्नाटकातील पदाधिकाऱ्यांना कळत नसे. कोल्हापूरच्या जैन बोर्डिंग सारखेच कर्नाटकात सुरू करावे अशी मागणी होऊ लागली. दक्षिण भारत जैन सभेच्या हुबळी येथील पदाधिकाऱ्यांनी हुबळीमध्ये द. भा. जैन सभांतर्गत जैन बोर्डींग चालू करण्याचे ठरविले. भाषेंची अडचण असल्याकारणाने कर्नाटकातील जैन विद्यार्थ्यांना कोल्हापूरच्या बोर्डिंगमध्ये येऊन राहणे शक्य होत नसे तसेच हुबळी येथील बोर्डिंगसाठी व्यापारी व कार्यकर्ते यांच्याकडून आर्थिक व अपेक्षित सहाय्य मिळविण्याची शक्यता असल्याने हुबळीला बोर्डिंग सुरू करण्याचे ठरविण्यात आले. धारवाड जिल्ह्यात हुबळी हे सर्वात मोठे शहर व रेल्वे जंक्शन आहे. हे शहर पूर्वीपासून औद्योगिक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. तेथ द. म. जैन संभेतर्फे जानेवारी १९०७ मध्ये जिनमंदिरात बोर्डिंग सुरू करण्यात आले. सुरूवातीला फक्त ५ विद्यार्थी होते. जिनमंदिराच्या दरवाजातील दोन्ही खोल्यात हे बोर्डींग सुरू झाले. दि डिस्ट्रीक्ट जज्ज श्री एच. पी. गुंजाळ हे सेक्रेटरी होते. त्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या सालोसाल वाढत गेली तेव्हा कौल पेठेतील आपल्या राहत्या घराच्या माडीवर अधिक विद्यार्थ्यांची सोय श्री हजारे यांनी केली.[११] २७/३/१९०९ या दिवशी हुबळी बोर्डिंगची स्थापना करण्यात आली आहे. त्या दिवशी सकाळी ८ वाजता हरदर बस्तीतून कुंभाची मिरवणूक समारंभाने निघून शहरातील मुख्य रस्त्यावरून कौल पेठेतील वस्तीत दाखल झाली. तेथे श्री जिनेंद्रभिषेक व सरस्वती पूजन करण्यात आले, नंतर बोर्डिंगात दाखल झालेल्या १४ मुलांना रत्नकरंड श्रावकाराचा पाठ सांगण्यात आला. श्री पायसागर स्वामी बिद्रे यांच्या हस्ते बोर्डिंगचा धार्मिक स्थापणाविधी यथासांग करण्यात आला. त्यांना या भागातील लोक 'नेम्माण्णा स्वामी' असे घरगूती व प्रेमळ नावाने संबोधीत असत. त्याचदिवशी सायंकाळी ५ वाजता धारवाड जिल्ह्याचे कलेक्टर मि. हडसनसाहेब

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यांच्या हस्ते जाहीर उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी दक्षिण महाराष्ट्र जैन सभेचे महामंत्री श्री आण्णाप्पा फडयाप्पा चौगुले, वकील बेळगाव यांनी आपल्या प्रास्ताविक इंग्रजी भाषणात जैन लोकांचा इतिहास थोडक्यात कथन करून द. म. जैन सभेचे उद्देश व तिची आजपर्यंतची कामगिरी या संबंधी विस्तृत माहिती दिली तसेच हुबळी हे व्यापाराचे व कानडी भाषा बोलणाऱ्यांचे केंद्रस्थान असल्यामुळे हुबळीला एक जैन बोर्डिंग स्कुल असण्याची फार आवश्यता होती. म्हणून द.म.जैन सभेतर्फे हे बोर्डिंग स्थापना करण्यात आले असे सांगितले. उद्घाटनप्रसंगी हडसन साहेब म्हणाले''

''जैन लोकांच्या प्राचीन थोरवीला अनुसरून त्यांच्याकडून विद्याप्रसाराबद्दल जे प्रयत्न चालू आहेत ते अभिनंदनीय आहेत. त्यापैकीच हा एक बोर्डिंगचा प्रयत्न असून त्यामुळे ज्ञान प्रसाराला फार मोठी मदत होते. याकरिता बोर्डिंगची व्यवस्था उत्तम ठेऊन त्यासाठी सुपरिटेंडेट नेमावयाचा तो हुषार व सद्वर्तनी असा नेमावा अशी माझी जैन पुढाऱ्यांना सूचना आहे. विद्येमध्ये मागासलेले जैन लोक पुढे येत आहेत. याबद्दल मला मोठा आनंद वाटत असून त्याच्या प्रयत्नास पूर्ण यश येवो अशी माझी उत्कट इच्छा आहे.''[३०]

## हुबळी बोर्डिंगची इमारत :

इ.स. ८/४/१९१० रोजी हुबळी येथील प्रसिद्ध सावकार श्री भरमाप्पा टाकाप्पा हरपनहळ्ळी यांनी बोर्डिंगची इमारत बांधण्यासाठी हुबळी स्टेशनजवळील हमरस्त्यावरची ३०० फुट लांब व १०० फुट रुंदीची अदमासे ३ हजार रु. किंमतीची आपली प्रशस्त जागा मोफत देऊन दक्षिण महाराष्ट्र जैन संस्थेच्या नावाने त्यासंबंधी बक्षिसपत्रही करून दिले. बोर्डिंगला दिलेली ही जागा श्री भरमाप्पा हरपन्नहळ्ळी यांनी लिंगायत लोकांच्या मुरसावीर मठाच्या स्वामीजीकडून ९९ वर्षाचा करार करून निरंतर भाडेपट्याने घेतली होती. अत्यंत उपयुक्त व हवेशीर अशी जागा मिळाल्याने त्यावर १० खोल्यांची एक इमारत बांधण्याचे काम

त्याचवर्षी म्हणजे १९१० साली सुरू झाले बोर्डिंगचे कार्यकर्ते व विद्यार्थी यांनी जिल्हाभर फिरून बांधकामासाठी देणग्या गोळा केल्या व त्यातून इमारतीचे बांधकाम १९१२ साली पूर्ण करण्यात आले. या इमारतीला अंदाजे १० हजार रुपये खर्च आला. नंतर परत देणग्या मिळवून आंघाळीची खोली, स्वयंपाकघर, भोजनगृह, सामानाची खोली, माळ्यासाठी कोल्या, संडास, कंपौडची भिंत, आदि बांधकाम काढून घेतले. या सर्व कामासाठी श्री भरमाप्पा हरपनहळ्ळी, श्री रायप्पा नवळूर, श्री इंगनगौडा पाटील, साकीन गुडीसागर, रिटायर्ड फौजदार श्री अनंतप्पा मंटगणी आदि कार्यकर्त्यांनी अत्यंत परिश्रम घेतले ही सर्व बांधकामे १९२० च्या सुमारास पूर्ण झाली व ती पाहून लोकांच्या उस्फूर्त दानाचा ओघ बोर्डिंगकडे यावयास सुरवात झाली. या बोर्डिंगसाठी सन १९१९ सालाी उप्पीनबेटगिरी येथील रहिवाशी श्री मल्लाप्पा दुंडाप्पा सगरे यांनी आपली २ एकर जमीन बक्षिस दिली. तसेच श्रीमती सुंदराक्का शिवरामाप्पा दोडमुणी गुडेनकट्टी यांच्या स्मरणार्थ त्याचे पती शिवरामप्पा यांनी बोर्डिंगच्या आवारात एक विहिर सुमारे २ हजार रुपये खर्चून बांधून दिली. शिवाय हुबळीचे प्रसिद्ध व्यापारी श्री धरणेद्रप्पा नागप्पा टिकण्णावर यांनी बोर्डींगच्या आवारात श्री चंद्रप्रभू तिर्थकाराचे जैनमंदिर स्वत:च्या खर्चाने बांधून देण्याचे १९२१ सालाी वचन दिले व त्याचप्रमाणे बांधकामास सुरवात देंखील केली हे बांधकाम चालू असतानाच सी टिकण्णावर यांचा अंत झाला परंतू या परिस्थितीत खचून न जाता त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती तवनव्वा टिकण्णावर यांनी सुमारे ८०००/- रु. खर्चून १९२३ साली मंदिराचे बांधकाम पूर्ण केले आणि मार्च १९२४ मध्ये या मंदिराच्या पंचकल्याण पूजा महोत्सव मोठ्या थाटाने साजरा केला.[३१]

हुबळी बोर्डिंगला १९२५-४५ पर्यंतची २० वर्ष फारशी चांगली गेली नाहीत या बोर्डिंगला कायम उत्पादनाच्या कुठल्याही बाबी स्थानिक कमिटी किंवा द. भारत जैन सभा यांच्याकडून न पुरवल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी देणे

14776

A

परवडणाऱ्या नव्हत्या यामध्ये काही प्रमाणात द. भारत जैन सभेचे पदाधिकारी व हुबळी बोर्डिगचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले होते. कारण स्थानिक कमीटीने बोर्डिंगचे खर्च स्थानिक मदतीतून चालवावेत. कारण सभेकडे कोणताही उत्पन्नाचा स्त्रोत नव्हता, पण सभा हुबळी बोर्डिंगला दुजाभावाने वागवत आहे. अशी भावना स्थानिक पदाधिकाऱ्यांची मनात होती. त्याचवेळी बोर्डिंगच्याकडे असणाऱ्या जागेवर मूरसावीर मठाच्या स्वामींनी दावा दाखल केला. त्यामुळे बोर्डिंगला बरेच पैसे खर्च करावे लागले व सुप्रिम कोर्टात हा दावा लढवावा लागला साहजिकच पदाधिकाऱ्याचे लक्ष्य दैनंदिन कामकाजापेक्षा या दाव्यातून बाहेर पडणे व त्याकरिता पैसे उभारण्याकडेच लागला. कोर्ट खर्चासाठी दान मिळालेल्या जमिनी १९१९-२१ मध्ये विकाव्या लागल्या. या सर्वासाठी हुबळीचे प्रसिद्ध वकील श्री. एस. पी. इंडी यांनी विनावेतन सुप्रिम कोर्टापर्यंत खटला चालवून बोर्डींगची फार मोठी इस्टेट बोर्डींगला मिळवून दिली. १९४५ मध्ये आ. लठ्ठेनी या प्रकरणात मध्यस्थी करून सभा व हुबळी बोर्डिंगचे संबंध गैर समज दूर करून आपुलकीचे वातावरण निर्माण केले.[३२]

१९६५ पर्यंत या बोर्डिंगच्या कार्याला गती आली नाही. त्यानंतर मात्र बोर्डिंगमधील हुबळी शहरातील काही इस्टेटी दान मिळाल्याने कार्य व्यवस्थित सुरू झाले. नवीन कार्यकर्ते पर्याप्त उत्पन्न व नवीन योजना यामुळे या बोर्डिंगला उर्जितावस्था आली.[३३] दक्षिण भारत जैन सभेचे चेअमरन श्री. बी.बी. पाटील यांनी ११-४-१९८४ ला हुबळीला भेट देऊन तेथील इस्टेटीसंबंधीचे बरेच वाद मिटविण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी दक्षिण भारत जैनसभेने १ लाख रुपये व कोल्हापूर बोर्डींग २५, बेळगाव बोर्डिंग २५ व सांगली बोर्डिंग १० हजार तर कोल्हापूर, सांगली श्रावकाश्रमाकडून प्रत्येकी ५ हजार गोळा करून एक वर्षाकरिता बोर्डींगला आर्थिक मदत करण्याचे ठरविले. दक्षिण भारत जैन सभेच्या वसतिगृहामध्ये

एकमेकांना आर्थिक मदत करून आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची ही वृत्ती अनुकरणीय आहे. त्यानंतर अनेक प्रयत्नांनी हुबळी बोर्डींगची आर्थिक व्यवस्था १९९० नंतर सुधारली.[३४]

## हुबळी बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या :

वस्तीगृहात २५ पर्यंत विद्यार्थी राहतात.[३५] या बोर्डिंगात कॉलेज शिक्षण घेणारे २५ विद्यार्थी आहेत. या बोर्डिंगात एकूण १० खोल्या असल्याने अधिक विद्यार्थ्यांची सोय जागेच्या अभावी होत नाही.[३६] तसेच ६० ते ७० च्या दशकामध्ये साधारणपणे ५५ ते ६० इतके विद्यार्थी होते.[३७] व ७० ते ८० च्या दशकात सरासरी विद्यार्थ्यांची संख्या ७० ते ८०च्या आसपास या टप्प्यात होती.[३८] हुबळी येथील जैन कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने महावीर एज्युकेशन सोसायटीतर्फे टेक्नीकलचे कोर्सेस चालू झाल्याने या कोर्ससाठी येणाऱ्या आसपासच्या खेड्यातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची अधिकाधिक राहण्याची सोय करावी लागत असल्याने येथील खोल्या अपुऱ्या पडत आहेत. विद्यार्थ्यांच्या लौकीक शिक्षणाबरोबरच त्यांच्यावर धार्मिक संस्कार व्हावेत यासाठी या शाखेने धार्मिक शिक्षण, पर्युषणपर्व यासारखे कार्यक्रम मोठ्याप्रमाणात साजरे केले.[३९]

हुबळी बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या सालाबादप्रमाणे दिलेली आहे. १९८१-८२ - ७८ विद्यार्थी, ८२-८३ - ६५ विद्यार्थी, ८३-८४ - ९२ विद्यार्थी, ८४-८५ - ५४ विद्यार्थी, ८५-८६ - ५० विद्यार्थी, ८६-८७ - ५० विद्यार्थी, ८७-८८ - ६४ विद्यार्थी, ८८-८९ - ६६ विद्यार्थी, ८९-९० - ६८ विद्यार्थी, ९०-९१ - ७५ विद्यार्थी, ९१-९२ - ७० विद्यार्थी, ९२-९३ - ९८ विद्यार्थी, ९३-९४ - ७४विद्यार्थी, ९४-९५ - ४६ विद्यार्थी, ९५-९६ - ४९ विद्यार्थी, ९७-९८ - ३८ विद्यार्थी, ९८-९९ - ३४ विद्यार्थी, ९९-२००० - २० विद्यार्थी, २०००-२००१ - २० विद्यार्थी.[४०]

हुबळी जैन बोर्डिंगचे वैशिष्ट्य म्हणजे गरीब व हुशार विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व जेवणामध्ये सवलत दिली जाते. पण धार्मिक शिक्षण सक्तीचे आहे. या बोर्डीगमध्ये ३१/१२/१९८४ च्या दरम्यान महावीर एज्युकेशन सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांसाठी टेक्नीकल कोर्सेस सुरू केलेले आहेत. १९८४-८५ पासून एस. पी. गारे, श्री. आर. डी. उपाध्ये, एस. आर. हिरेगौडर या पदाधिकाऱ्यांनी गरिब विद्यार्थ्यांसाठी मोफत राहण्याची व भोजनाची सोय केली आहे. वसतिगृहामध्ये मान्यवरांचे व गुणी विद्यार्थ्यांचे सत्कार, पर्युषणपर्व, स्नेहसंमेलन, राष्ट्रीय कार्यक्रम साजरे केले जातात.

**माणिकबाग दिगंबर जैन बोर्डिंग बेळगाव :**

सभेच्या नोव्हेंबर १९०९ कोल्हापूरला भरलेल्या अधिवेशनाच्यावेळी बेळगावचे जडजवाहिऱ्यांचे व्यापारी श्री धर्मराव आप्पाजीराव सुभेदार यांनी बेळगावला जैन बोर्डिंग सुरू करण्यासाठी वीस हजार रुपयांची उदार देणगी जाहीर केली. त्याप्रमाणे बोर्डिंग सुरू करण्यासंबंधीची पूर्वतयारी पूर्ण झाल्यानंतरची धर्मराव सुभेदार यांच्या नेतृत्वाखाली बेळगावच्या देशपांडे गल्लीतील सुंठणकराच्या वाड्यात सुभेदार जैन बोर्डिंग बेळगाव या नावाने दि. १ जून १९११ रोजी बोर्डिंग सुरू करण्यात आले. हे बोर्डिंग श्री सुभेदार यांनी १९१४ सालापर्यंत स्वत:च्या खर्चाने चालविले. सुरवातीला २० विद्यार्थी होते व १९१४ च्या सुरूवातीला ३२ विद्यार्थी होते. बोर्डिंग ठिक चालले होते व त्यावर सभेची देखरेख होती. परंतु आर्थिक अडचणीमुळे मी सुभेदार यांना आपल्या बृहदानाचे वचन पूर्ण करता न आल्याने १९१५ सालच्या सुरूवातीला ते बंद पडले. अचानकपणे सुभेदार जैन बोर्डिंग बंद झाल्याने त्यातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून लगेच दुसरे बोर्डिंग 'श्री जिनसेन दि जैन विद्यार्थीश्रम' या नावाने कुलकर्णी गल्लीत सुरू करण्यात आले.[४१]

सभेच्या व जैन समाजाच्या दृष्टीने एक अत्यंत दु:खद घटना याच सुमारास घडली. भारतातील जैन बोर्डिंग स्थापन करण्याच्या चळवळीचे आद्य प्रणेते सभेचे ज्येष्ठ नेते व मार्गदर्शक आणि कोल्हापूर जैन बोर्डिंगचे प्रमुख संस्थापक दानवीर शेठ माणिकचंद हिराचंद यांचे गुरूवार दि. १६ जुलै १९१४ रोजी मुंबईला त्यांच्या रत्नाकर पॅलेसमध्ये हृदयक्रिया बंद पडून अचानक निधन पावले त्यांनी या भागातील जैनांच्या उन्नतीसाठी अत्यंत परिश्रम घेतले व अनेक प्रकारे सक्रीय सहाय्य देखील केले होते त्यामुळे त्यांच्या विषयीची नितांत कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी त्यांचे एखादे चिरंतन स्मारक या भागात कोठेतरी करावे असे लोकांना वाटत होते. शेठ माणिकचंद हिराचंद यांचे एखादे भरीव स्मारक करावे या विचारात सभेची चालक मंडळी असतानाच बेळगावचे सुभेदार जैन बोर्डिंग बंद पडले ही खेदजनक अवस्था लवकर संपवून बेळगावला कायमस्वरूपाचे जैन बोर्डिंग ताबडतोब सुरू करण्याच्या उद्देशाने, इराद्याने श्री आण्णासाहेब लठ्ठे बळवंतराव धावते, श्री भाऊ रामगोंडा पाटील, श्री आण्णाप्पा फड्याप्पा चौगले, श्री आप्पासाहेब देसाई हनगंडीकर, श्री रावसाहेब अंकले, श्री तननाप्पा गुंडाप्पा इंगळे, श्री बाळासाहेब मिर्जि, श्री सावंताप्प पत्रावळी आदी सभेचे प्रमुख कार्यकर्ते खटपटीस लागले. सुदैवाने यांच्या प्रयत्नांना यश आले. सभेचे चालक जागेच्या शोधात असताना त्यांना बेळगाव शहरापासून थोड्या दूर अंतरावर पण पुणे-बेंगलोर हमरस्त्यावर असलेली तीन एकर चौदा गुंठे जागा व शाळेची इमारत तेथील अमेरिकन मिशनरी संस्थेने विकावयास काढली आहे. अशी बातमी मिळाली. बेळगावचे स्थानिक लोक ही जागा विकत घेण्यास आतूर होते. म्हणून कसलाही विलंब न लावता सभेतर्फे दि. ब. आण्णाप्पा चौगले, श्री भाऊ रामगौडा पाटील, श्री तवनाप्पा इंगळे व श्री बळवंतराव धावते यांचे एक शिष्टमंडळ अमेरिकन मिशनच्या चालकांना भेटावयास गेले. या भेटीत दि. ब. चौगुले यंनी सभेने चालविलेल्या शैक्षणिक कार्याचा समग्र परिचय मिशनच्या चालकांना प्रभावी रीतीने करून दिला आणि मिशनची जागा विकावयाची झाल्यास सभेलाच द्यावी अशी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आग्रहपूर्वक विनंती केली. शिष्टमंडळाच्या भेटीचा व विचार विनिमयाचा अमेरिकन मिशनच्या चालकावर अतिशय चांगला परिणाम झाला. मिशनची जागा विकावी की विकु नये अशा द्विधा मन:स्थितीत असलेल्या मिशनच्या चालकांनी आपली जागा पवित्र शिक्षण कार्यासाठीच उपयोगात आणली जाणार आहे हे स्पष्ट झाल्याने सभेला विकत देण्याचे ठरले. त्याप्रमाणे किंमतीबद्दल वाटाघाटी होऊन ती जागा व इमारत ६२०० रुपयास सभेला देण्याचे मिशनने निश्चित केले. हे कळल्यावर बेळगावच्या काही व्यापाऱ्यांनी ती जागा याहून कितीतरी जास्त किमतीत विकत घेण्याची आपली तयारी मिशनजवळ दाखविली पण अमेरिकन मिशनच्या चालकांनी आपले वचन मोडले नाही हे विशेष होय. तेव्हा वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे दि. ५/७/१९१५ रोजी सभेच्या वतीने श्री आण्णा फडमाप्पा चौगले, श्री आण्णा बाबाजी लठ्ठे, श्री भाऊ रामगोंडा पाटील या तिघांच्या नावाने मिशनच्या जागेचे व इमारतीचे खरेदीपत्र झाले.[४२] ही प्रशस्त जागा व इमारत सभेच्या ताब्यात आल्यावर या ठिकाणी सभेच्या मागील अधिवेशनातील ठरावानुसार दानवीर शेठ माणिकचंद हिराचंद यांचे चिरंतन व योग्य स्मारक करण्याचे निश्चित आले. त्याप्रमाणे या प्रशस्त जागेला माणिकबाग असे नाव देण्यात आले हे नाव अत्यंत समर्पक होते. खुद्द शेठ माणिकचंद हिराचंद यांनी आपले पुज्य पिताजी हिराचंद यांच्या स्मरणार्थ मुंबईला बांधालेल्या धर्म शाळेला 'हिराबाग' असे नाव दिले होते. म्हणून त्याच धर्तीवर शेठ माणिकचंद हिराचंद यांच्या स्मरणार्थ या जागेला 'माणिकबाग' असे अन्वर्थक नावे संस्थेने दिले. तसेच या जागेतील इमारतीत सभेतर्फे बोर्डींग परत सुस्थितीत करण्याचे ठरविले आणि जैन सभेच्या अखत्यारितील या बोर्डींगला 'माणिकबाग दिगंबर जैन बोर्डींग बेळगाव' असे नवीन नाव देण्यात आले. गावातील श्री जिनसेन दि जैन विद्यार्थ्याश्रमात तात्पुरते रहावयास गेलेल्या सुभेदार बोर्डींगच्या ३२ विद्यार्थ्यांना परत सभेच्या बोर्डींगात घेण्यात आले. अशारितीने १९१५ सालापासून बेळगांव येथे माणिक बाग जैन बोर्डींग सुरू झाले.[४३] कारण आ. लठ्ठे कोल्हापूर बोर्डींग सोडून

बेळगावात स्थाईक झाले व त्यांनी बोर्डिंगच्या सेक्रेटरीचे काम पत्करून बोर्डिंगला शिस्त लावून दिली.

**बेळगाव बोर्डिंगची इमारत :**

प्रथम वसतिगृहाच्या आवारामध्ये स्वयंपाकगृह व भोजनगृह बांधले. श्री देवेंद्र चिंतामणी कोल्हापुरे या होसूरच्या व्यापाऱ्याने एक हजार रुपये खर्च करून बोर्डिंगच्या आवारात एक विहिर बांधून दिली. माणिकबाग बोर्डिंगच्या खर्चासाठी उत्पन्न मिळविण्यासाठी श्री धर्माप्पा मिरजी यांच्या माणिकबाग आईल मिलला १९३९ मध्ये ८०० रु. भाडे पट्टीवर वर्षासाठी जागा भाड्याने दिली तसेच मेनरोडची १५ गुंठे जागा टिंबर मर्चन्ट पत्रावळी ॲण्ड सन्स यांना १५०/- रु. वार्षिक भाड्याने दिली. या दोन्ही जागांचे भाडे तर वाढले नाही पण ती जागा न सोडता या भाडेकरूंनी बोर्डिंगच्या प्रशासनाला त्रास दिला. मेनरोडवरील या जागा दोन्ही भाडेकरूंच्या दृष्टीने लाभदायक होत्या परंतु भाडे वाढ न झाल्याने बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना सोयी पुरविण्यात प्रशासन हतबल झाले. याचा एक उल्लेख १९५० सालच्या अहवालात केलेला आढळतो तो पुढीलप्रमाणे -

''धर्माण्णा मिरजी तेथील वसतिगृहाचे चेअरमन आहेत. त्यामुळे या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याची जबाबदारी प्रामुख्याने त्याच्यावरच येते.''

अर्थात हे सभेचे आवाहन ऐकण्याच्या मनस्थितीत हे भाडेकरू नव्हते त्यामुळे १९७१ सालपर्यंत झालेल्या दाव्यानंतर श्री मिरजी यांच्याकडील जागा सभेला परत मिळाली व त्या जागेवर उत्पनाची नियमित सोय करण्यासाठी दुकानगाळे बांधून बोर्डिंगचा विकास करण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला. बेळगाव शहर हे के.एल.ई. सोसायटीच्या व इतर संस्थांच्या स्थापनेनंतर शै. दृष्ट्या सुधारलेले कर्नाटकातील एक शहर बनले. त्यामुळे मेडिकल, इंजिनिअरिंग व इतर विद्याशाखातून प्रवेश घेऊन बोर्डिंगमध्ये कमी खर्चात व

संस्कारात राहण्याची गरज कर्नाटक व महाराष्ट्र येथील दोन्ही राज्यातील विद्यार्थ्यांना अगत्याचे होते.[४४] १९७५ सालापर्यंत निवास, भोजन, धर्मशिक्षण, औषधपाणी इ. अनेक सोयीनीयुक्त असे हे वस्तीगृह ६५ विद्यार्थ्यांना सुविधा पुरवित होते. १९७२ साली श्री चंद्रप्रभू जैन मंदिर श्री भूपालराव देसाई व ज्वालनादेवी देसाई यांनी ४०,०००/- खर्च करून बांधून दिले. त्याचा उद्‌घाटन समारंभ श्री देवराज अर्स मुख्यमंत्री कर्नाटक राज्य यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगामुळे बोर्डिंगचे अनेक प्रश्न मिटविण्यात कार्यकर्ते यशस्वी झाले. द. भारत जैन सभेचे ६२ वे अधिवेशन बोर्डिंगच्या आवारात भरले व जैन युवक परिषद ही यशस्वीपणे पार पडली. त्यामुळे माणिकबाग दि.जै.बो. ला उर्जितावस्था प्राप्त झाली.[४५]

१० जून १९७९ ला वैशाली बिल्डींग ग्रंथालय व विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली. १९८० मध्ये २ लाख ७० हजार रुपयांच्या नवीन इमारती बांधल्या गेल्या. सन १९८४ मध्ये विद्यार्थ्यांसाठी ४१ खोल्या बांधल्यामुळे १०० विद्यार्थ्यांची सोय झाली. १९८६ नंतर रिकाम्या जागेत लग्नमंडप व कार्यक्रमासाठी हॉल यांची उपलब्धता झाल्याने बोर्डिंगचे उत्पन्न वाढले या बोर्डिंगसाठी ८० नंतर बेळगाव नगरपालिकेकडून २ एकर जागा ९९ वर्षे कराराने भाडेपट्ट्यावर घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थी निवास व कल्याण मंडप बांधला गेला त्यानंतर बेळगावच्या किल्ल्यामधील जागा १९९८ ला खरेदी केली त्याचा सर्व खर्च समाज देणीतून उभारला गेला या जागेवर मंदिर उभारून त्याचा पंचकल्याण महोत्सव २००२ या काळात पार पाडला. कर्नाटक सरकारने बेळगांव बोर्डिंगला अल्पसंख्याकाच्या सवलतीमधून १ लाख रु. चे अनुदान दिले.[४६]

बेळगावमधील जैन समाज माणिकबन दिगंबर जैन बोर्डिंगमधील हिरारीने भाग घेतो. त्यामुळे १९८० नंतर बोर्डिंगच्या विकास वाढीला फार मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे या बोर्डिंगचे आणखी एक महत्त्वाची वैशिष्ट्य म्हणजे श्रवणबेळगोळला

जाणारे सर्व मूनीसंघ व यात्रेकरू येथे निवासाच्या अपेक्षेने येतात त्यामुळे या बोर्डिंगचे प्रशासन त्यांची व्यवस्था करणे यामध्ये नेहमीच मग्न राहते येथील विद्यार्थीही मूनीसंघ, आर्यिका संघ यांचे आहार यांच्या व्यवस्थेमध्ये फार मोठ्या प्रमाणात योगदान देतात. त्यामुळे मा. दि. जैन बोर्डिंग हे बोर्डिंग राहिले नसून दक्षिण उत्तरेतील जैन समाजाच्या एकोप्याचे महत्त्वपूर्ण केंद्र जुन्या पुणे-बेंगलोर महामार्गावर दिमाखाने उभे आहे. मध्यंतरीच्या काळात अर्थव्यवस्थेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले असले तरी द. भा. जैन सभेच्या पदाधिकाऱ्यांनी सहयोग देऊन स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या मदतीने बेळगाव जैन बोर्डिंग उत्कृष्ट बोर्डिंग म्हणून नावलौकिकास पोहचविले आहे.

**माणिकबाग दिगंबर जैन बोर्डिंगमधील विद्यार्थांची संख्या :**

बेळगावला उच्च शिक्षणाच्या सोयी वाढत, व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. ५० ते ६० च्या दशकामध्ये बेळगाव बोर्डिंमधील विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ ४५ ते ५० च्या दरम्यान होती. त्याप्रमाणे ७०-८० च्या दशकात विद्यार्थ्यांची सरासरी संख्या ७५ ते ८५ या दरम्यान होती. सध्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी नवीन बांधलेल्या ३५ खोल्या असून जुन्या इमारतीमध्ये ६ खोल्यांमध्येही विद्यार्थी राहण्याची व्यवस्था आहे. तसेच १९८५-९५ या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये बेळगाव बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्या जवळपास १००-११० होती.

१९९५ ते २००० या वर्षातील बेळगाव बोर्डिंगमधील विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे - १९९५-९६ - ७० विद्यार्थी, १९९६-९७ - ६८ विद्यार्थी, १९९७-९८ - ६० विद्यार्थी, १९९८-९९ - ७२ विद्यार्थी, १९९९-२००० - ७२ विद्यार्थी, २०००-२००१ - ६० विद्यार्थी.[४७]

## रा. ध. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली :

सांगली भागात जैन वस्ती फार असल्याने व ग्रामीण भागातील जैनांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याची निकड असल्याने सभेच्या सांगलीकरच्या जैन कार्यकर्त्यांना सांगलीला जैन बोर्डिंगची लवकर स्थापना करावी अशी तीव्र इच्छा होती या इच्छेला मूर्त स्वरूप देण्यासाठी श्री भाऊ रामगोंडा पाटील श्री वसंतराव चंद्राप्पा धावते, श्री तवनाप्पा गुंडाप्पा इंगळे, श्री दादा घोदे, श्री आरवाडे बंदू आदी सभेचे सांगलीचे कार्यकर्ते खटपट करीत होते. त्यांच्या खटपटीला यश आले आणि १९१० साली सांगलीच्या पांजरपोळ कमिटीच्या जागेत मुंबईचे दानवीर शेठ माणिकचंद हिराचंद यांच्या शुभहस्ते सांगली जैन बोर्डिंग सुरू करण्यात आले.[४८]

फेब्रुवारी १९११ मध्ये सांगलीला भरलेल्या सभेच्या १३ व्या वार्षिक अधिवेशनात सर्वानुमते ठरले. व त्याप्रमाणे प्रयत्नांना सुरवातही झाली. अधिवेशनाच्या वेळी झालेल्या पंचकल्याण पूजेला उपस्थित राहण्यासाठी आलेले दावणगिरीचे प्रसिद्ध व्यापारी श्री जाहप्पा तवन्नप्पणावर यांनी बोर्डिंगच्या इमारतीचा प्रश्न स्वखर्चाने सोडविण्याची विनंती सभेच्या उच्च पदस्थ शिष्टमंडळाने केली व श्री तवन्नप्पावर यांनी ती मान्यही केली परंतु थोड्याच दिवसांनी श्री तवन्नापणावर यांना व्यापारात भयंकर नुकसान आल्यामुळे नाईलाजाने ते आपले वचन पूरे करू शकले नाहीत.

नवीन जागेचा शोध चालू असतानाच बोर्डिंगसाठी पांजरपोळ कमिटीने दिलेली मोफत जागा त्यांना जरूर असल्याने १९१२ साली बोर्डिंग दुसरीकडे हलविले भाग पडले. म्हणून गणपती पेठेतील धुळगांवकर इनामदार दुबल यांच्या इमारतीत जागा भाड्याने देऊन तेथे बोर्डिंग नेण्यात आले. बोर्डिंगसाठी स्वतंत्र जागा विकत घ्यावी अशी कार्यकर्त्यांची सुरवातीपासूनची इच्छा होती. पण पैशाच्या अभावी त्यांना जागा खरेदीचा विचार रहित

करावा लागला. दरम्यान बोर्डिंगचे पहिल्यापासूनचे सेक्रेटरी श्री भाऊ रामगौडा पाटील व त्यांचे सहकारी कार्यकर्ते एखाद्या सोयीस्कर जागेच्या शोधात होतेच त्यावेळी त्यांना मिरजेच्या शेठ गोविंददास या गुजराती व्यापाऱ्याच्या मालकीची सांगली हायस्कुल समोरील मध्यवर्ती वस्तीतील इमारत व मोकळी जागा विकावयाची आहे असे समजते. ही जागा बोर्डिंगसाठी अत्यंत उपयुक्त वाटल्याने ती विकत घ्यावी असे ठरले आणि खरेदीच्या वाटाघाटीसाठी कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ शेठ गोविंददास यांना भेटण्यास मिरजेस गेले. वाटाघाटीत १२ हजार रुपयांचा व्यवहार ठरला व एक महिन्याच्या मुदतीत तो पुरा करण्याचे ठरविले. या व्यवहारातील आगाऊ द्यावयाची रक्कम १००० रुपयाची रक्कम श्री भाऊ रामगौंडा पाटील यांनी ताबडतोब शेठ गोविंददास यांना स्वत:च्या पैशातून दिली. दिलेल्या एक महिन्याच्या मुदतीत हा व्यवहार पूर्ण न झाल्याने शेठ गोविंददास यांनी नोटीस दिली व त्यामुळे भाऊ रामगोंडा पाटील यांनी दिलेले १००० रु. बुडण्याचा धोका निर्माण झाला. तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य, समाजाची प्रतिष्ठा व जागेची निकड या गोष्टी विचारात घेऊन श्री धावते इंगळे वैगरे कार्यकर्त्यांनी मोठ्या जिद्दीने सर्व पैसे जमविले व रितसर खरेदीपत्र करून १९१८ च्या मे महिन्यात जागा ताब्यात घेतली. तेव्हापासून सांगली जैन बोर्डिंगला आपल्या मालकीची जागा मिळाली. पण विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे ही विकत घेतलेली इमारत देखील अपुरी पडू लागली. म्हणून या इमारतीच्या मागच्या बाजूस लागून असलेला एक मोकळा प्लॉट आरवाडे बंधूकडून बोर्डिंगच्या चालकांनी अल्प किंमतीत मिळविला आणि या मोकळ्या जागेवर जुल्या इमारतीला लागून पश्चिमेच्या बाजूला एक दुमजली इमारत बांधण्यास सुरवात केली.[४१] पण पैशाच्या अभावी बांधकामास जोर येईना आणि बांधकाम तर लवकर संपविणे आवश्यक होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी एखाद्या धनिकाकडून मोठी रक्कम मिळाल्यास फार चांगले होईल असे कार्यकर्त्यांना वाटू लागले आणि या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करावयाचे असे ठरविले. कर्मवीर बळवंतराव धावते यांनी या बाबतीत पुढाकार

घेऊन सांगलीच्या व्यापारपेठेशी घनिष्ट संबंध असलेले नातेपूते गावचे प्रसिद्ध व्यापारी शेठ रामचंद्र धनजी दरवडा यांच्याशी संपर्क साधून बोर्डिंगच्या अचडणी त्यांना समजावून दिल्या व बोर्डिंगला भेट देण्याची विनंती केली. वस्तीगृहाची शिस्त तेथील वातावरण, सभेचे ठिकठिकाणी चाललेले शैक्षणिक कार्य व सांगलीच्या कार्यकर्त्यांची जिद्द पाहून शेठ दावडा फार प्रभावित झाले आणि त्यांनी बोर्डिंगला २०,००० रुपयाचे बृहदान दि. ४/८/१९१९ रोजी घोषित केले. या दानापैकी १५,००० रुपये वस्तीगृहाच्या बांधकामासाठी खर्च करावयाचे आणि उरलेल्या ५०००/- रुपयांच्या ठेवीच्या व्याजातून येणारी रक्कम वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना धर्मशिक्षणासाठी उपयोगात आनावयाची असे ठरले. कोल्हापूरच्या बोर्डिंगप्रमाणे सांगलीच्या बोर्डिंगलाही २० हजार रुपयांचे मोठे दान मिळाल्याने सांगलीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला आणि त्यांनी लवकरच २५ हजाराच्या देणग्या मिळवून अपुरे राहिलेले बांधकाम पुरे करून एक खोल्यांची दुमजली अल्य व नमुनेदार वास्तू उभी केली.[५०] शेठ दावडा यांच्यासंबंधीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बोर्डिंगला शेठ रामचंद्र धनजी दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली असे नावे देण्यात आले. आणि बोर्डिंगच्या नतून इमारतीचा उद्‌घाटन समारंभ दि. २८/११/१९२२ रोजी मुंबईचे गव्हर्नर नेक नामदार सर जॉर्ज ॲम्बोस लॉईड यांच्या हस्ते अतिशय भव्य रितीने साजरा झाला.[५१]

## सांगली बोर्डिंगची इमारत :

बोर्डिंगचे पहिले सेक्रेटरी व सभेचे मार्गदर्शक नेते श्री. भाऊ रामगोंडा पाटील यांनी १९३५ साली विविध देणग्यातून क्लबची इमारत बांधण्यात आली श्री आनंदराव आरवाडे यांनी १९४० साली विहीर बांधून दिली. विशेष म्हणजे बोर्डिंगच्या माजी विद्यार्थ्यांच्या देणग्यातून १९४५ साली माजी विद्यार्थी हॉल बांधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी सन १९२२ पासून १९६५ पर्यंत फक्त ३४ खोल्याच उपलब्ध होत्या आणि त्यामध्ये ८० विद्यार्थ्यांची सोय होत होती. त्यात वाढ करणे आवश्यक झाल्याने १९६४ साली देणग्या

जमवून १२ खोल्यांची तीन मजली इमारत बांधण्यात आली. या इमारतीला सुमारे ३५ हजार रुपये खर्च आला आणि तिचा उदघाटन समारंभ शेठ लालचंद हिराचंद यांच्या शूभ हस्ते संपन्न झाला. त्यामुले १९६५ पासून १२५ विद्यार्थ्यांची बोर्डिंगात सोय होऊ लागली.

विद्यार्थ्यांची वाढती मागणी लक्षात घेवून बोर्डिंगच्या चालकांनी बोर्डिंगच्या आवारातील पूर्व भागावरील जूनी कौलारू समारत असलेल्या जागेवर अद्यावत सोयीची आणि ८० खोल्या असलेली अन्य अशी तीन मजली इमारत बांधण्याचा संकल्प केला या नियोजित इमारतीचा भूमिपूज समारंभ विजयादशमीच्या मुहूर्तावर दि. १७/१०/१९७२ रोजी सभेचे अध्यर्यु वसतिगृहाचे शिल्पकार व समाजाचे भिष्माचार्य नी भाऊ रामगौंड पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या संकल्पानुसार १९७४ पर्यंत २६ खोल्या बांधून झाल्या. या नूतन इमारतीचे उद्घाटन सभेचे खजिनदार व कोल्हापूर बोर्डिंगच्या विकासाचे सूत्रधार श्री शांतीनाथ तवनाप्पा पाटणे यांच्या हस्ते सांगली बोर्डिंगचे माजी विद्यार्थी श्री देवेंद्र तात्या पाटील यांचे अध्यक्षतेखाली दि. २०/१/१९७४ रोजी करण्यात आले या नवीन इमारतीतील खोल्यांमुळे १९७५ पासून सुमारे १७५ विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय बोर्डिंगमध्ये झाली आहे.[५२]

**सांगली बोर्डिंगमधील विद्यार्थी संख्या :**

कोल्हापूरच्या खालोखाल विद्यार्थ्यांचा भरणा.[५३] अनुक्रमे ८३ व ८५ विद्यार्थी राहत असून त्यापैकी जवळ जवळ निम्मे विद्यार्थी कॉलेज शिक्षण घेणारे होते.[५४] ४५ विद्यार्थी कॉलेज शिक्षण घेणारे होते. बोर्डिंगची व्यवस्था चालक वर्ग चांगल्या रितीने पार पाडित आहेत.[५५] त्याचप्रमाणे ६० ते ७० च्या दशकात विद्यार्थ्यांची संख्या सरासरी १०० ते ११० इतकी होती. ७० ते ८० च्या दशकामध्ये बोर्डिंगमधील विद्यार्थी संख्या जवळ जवळ १०० ते ११० दरम्यान होती.[५६]

१९८४-८५ - ११७ विद्यार्थी, ८५-८६ - १७० विद्यार्थी, ८६-८७ - १६५ विद्यार्थी, ८७-८८ - १८० विद्यार्थी, ८८-८९ - २५२ विद्यार्थी, ८९-९० - २०० विद्यार्थी, ९०-९१ - २०० विद्यार्थी, ९१-९२ - १८० विद्यार्थी, ९२-९३ - २३० विद्यार्थी, ९३-९४ - २०० विद्यार्थी, ९४-९५ - २१० विद्यार्थी, ९५-९६ - २०० विद्यार्थी, ९६-९७ - २२० विद्यार्थी, ९७-९८ - २०० विद्यार्थी, ९८-९९ - १९० विद्यार्थी, ९९-२००० - १९० विद्यार्थी, २०००-२००१ - २०० विद्यार्थी, २००१-२००२ - २२० विद्यार्थी, २००२-२००३ - १८० विद्यार्थी, २००४-२००५ - १९० विद्यार्थी, २००५-२००६ - १८० विद्यार्थी.[५७]

**दिगंबर जैन बोर्डिंग इचलकरंजी :**

इचलकरंजीच्या कार्यकर्त्यांनी सभेपासून प्रेरणा घेऊन पण स्वत:च्या प्रयत्नानी १९२३ साली बोर्डिंग सुरू केले या बोर्डिंगच्या उद्‌घाटन समारंभ दि. १९/४/१९२३ रोजी इचलकरंजीचे युवरात श्रीमंत व्यंकटराव घोरपडे यांच्या हस्ते झाला व त्यांनी बोर्डिंगला संस्थानातील सर्व मदत देण्याचे आश्वासन दिले. पण हे बोर्डिंग दोन-तीन वर्षात बंद पडले. त्यानंतर १९६५ मध्ये दक्षिण भारत जैन सभेच्या इचलकरंजीच्या जैन अधिवेशनात पुन्हा वसतिगृह काढण्याचा विचार पुढे आला. १९३७ ला ए.एस्सी. कॉलेज जवळील ११ प्लॉट सभेने खरेदी केले. पण पुढे १० वर्षे फारशी कार्यवाही होऊ शकली नाही.[५८]

**बोर्डिंगची इमारत :**

जागा मिळाली तरी इचलकरंजी येथे वसतिगृह बांधण्याकरिता तेथील कार्यकर्त्यामध्ये उत्साह नव्हता म्हणून अनेक वर्ष तेथील काम रेंगाळलेले होते. तेव्हा या कामाला चालना देण्यासाठी इचलकरंजी येथील कार्यकर्त्यांच्या २/३ बैठका घेतल्या गेल्या. त्यांनी सहकार्य देण्याचे मान्य केले. मूळ मालकाने सभेला जागा दिलेली असली तरीही बरीच वर्ष बांधकाम नाही हे पाहून त्यातील थोडी जागा त्याने दुसऱ्या दोघांना विकली. त्याचवेळी एस.टी. चे काही अधिकारी तेथे गेले होते. जागा रिकामी पाहून एस.टी. आवारासाठी ती जागा विकत

घ्यावी असा रिपोर्ट त्या अधिकाऱ्यांनी कोल्हापूरास वरिष्ठांकडे केला आहे असे समजले. कार्यकर्ते कोल्हापूर येथील प्रमुखांना भेटले. ही जागा द. भा. जैन सभेने घेतलेली आहे. तेथे बोर्डिंग बांधायचे आहे. तरी आपण आपला रिपोर्ट शासनाकडे पाठवू नये. आपणास जागा तर मिळणार नाहीच पण आमच्या वतीने कोर्ट सुरू झाले तर आमच्या संस्थेचे कामही थांबेल व आपल्यालाही कामात व्यत्यय येईल.एस. टी. चे अधिकारी समजूतदार होते. त्यांना जागा ताब्यात घेण्याबाबतचा रिपोर्ट नामंजूर केला.

या नियोजित बोर्डिंगचे चेअरमन श्री मणेर रावसाहेब होते. सेक्रेटरी श्री कोले होते. त्यानंतर झपाट्याने निधी जमवणे व जागेला तारेचे कंपाऊंड केले. पाठोपाठ निधी ही गोळा केला. अल्पाधीतच ८०,००० ची आश्वासने मिळविली व त्यापैकी २६,००० रु. रोख मिळाले अखेर १९८६ मध्ये बोर्डिंगची इमारत बांधून झाली.[५९] २९ जून १९८६ पासून १० खोल्यांचे हे वस्तीगृह इचलकरंजी येथे नव्याने सुरू झाले. या बोर्डिंगची जागा मोठी आहे. यासाठी या जागेचा मास्टर प्लॅन काढून गरजेनुसार प्रत्येक वर्षात थोड्या इमारती वाढविण्याचा येथील स्थानिक कमेटीचे कार्यकर्ते विचार करीत आहेत.[६०] या वस्तीगृह आवारात विद्यार्थ्यांसाठी 'जिनमंदिर' बांधण्याची योजना हाती[६१] घेण्यात येऊन जिनमंदिराचे १९९९ मध्ये काम पूर्ण करून दोन मोठ्या हॉलचे बांधकाम पूर्ण करून घेतले. २००१ मध्ये दीड लाख रुपये खर्च करून शिवाप्पा आवटे यांच्या कुटुंबियानी त्यागी निवास बांधले याबरोबर सुपरिटेडेंट, वॉचमन यांचे निवास बांधून पूर्ण केले.[६२] तसेच विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाची पुस्तकेदेखील उपलब्ध करून दिली आहेत. विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार घडावेत यासाठी धर्मशिक्षणाची देखील व्यवस्था केलेली आहे. विद्यार्थ्यांना सर्व स्त्रीया पुरवरे यासाठी बोर्डिंगकडून पुरेपूर प्रयत्न केले जाते. १९९९ पासून या बोर्डिंगमध्ये कॉम्प्युटर ट्रेनिंग कोर्सेस सुरू केलेले आहेत. त्यामध्ये सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर ऑपरेटर, डिप्लोमा इन ऑफीस ॲटोमेशन, डिप्लोमा इन कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग, डी.टी.पी.

इत्यादी कोर्सेस चालू आहेत या सर्वामुळे दि.जै. बो. इचलकरंजी जैन समाजाचे एक प्रमुख शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र बनले आहे. येथील पदाधिकाऱ्याच्या योगदानामुळे ''जैन सांस्कृतिक व शैक्षणिक मंडळ ही संस्था स्थापन झाली असून त्या मार्फत अनेक सामाजिक कामे केली जातात महाराष्ट्राचे मँचेस्टर असलेल्या इचलकरंजी या कापड व्यवसायाचे केंद्र असलेल्या शहरात २० व्या शतकाच्या शेवटी द. भारत जैन सभा या बोर्डिंगच्या सहाय्याने आपले शैक्षणिक केंद्र निर्माण करून कार्य करीत आहे.''[६३]

**विद्यार्थ्यांची संख्या :**

सन १९२३ च्या सुरवातीस बोर्डिंमधील विद्यार्थ्यांची संख्या ५ ते १० या दरम्यान होती.''[६४] परंतु थोड्याच काळात हे बोर्डींग बंद पडले. आणि परत बोर्डिंग १९८६च्या सुरूवातीस चालू झाले. १९८६ मे २००६ या २० वर्षाच्या काळात विद्यार्थ्यांची संख्या पहिल्या दशकात १५ इतकी होती नंतर थोडी थोडी करत २० ते २५ पर्यंत वाढत गेली.''[६५]

**दक्षिण भारत जैन सभे अंतर्गत वसतिगृहाचे असफल प्रयोग :**

**१) एस.एस. भिरडी जैन बोर्डिंग जयसिंगपूर :**

जयसिंगपूर हे कोल्हापूर सांगली रस्त्यावरील जैन वस्तीचे महत्त्वपूर्ण ठिकाण तंबाखू व्यापार व इतर व्यवसायाच्या निमित्ताने आसपासच्या ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कुटुंबे जयसिंगपूरला येऊन २० व्या शतकात स्थायीक झाली आहेत. जयसिंगपूरला द. भा. जैन सभेचे अनेक पदाधिकारी वास्तव्य करून आहेत. त्यामुळे जयसिंगपूरलाही जैन सभेने बोर्डिंग चालू करावे ही मागणी बराच काळापर्यंत होती परंतू १९८५ सालापर्यंतची ही मागणी प्रत्यक्षात झाली नाही जयसिंगपूरमधील प्रसिद्ध श्री आमगौडा पाटील यांनी आपल्या नियोजित महावीर को-ऑप. हौसिंग सोसायटीत जैन बोर्डींगसाठी जागा राखून ठेवली. तत्कालीन व्हा. चेअरमन सुभाषचंद्र कॉलेज जे. जे. मगदूम ट्रस्ट संचलित लठ्ठे एज्यूकेशन संचलित कॉलेज यामुळे जयसिंगपूरमध्ये वसतिगृहाची निकड लाजवत होती. परंतु १९९५

सालापर्यंत आर्थिक अडचणी अभावी कोणतीच प्रगती झाली नाही. १९९६ च्या दरम्यान तात्पुरत्या जागेमध्ये प्रवेश निश्चित करावा यासाठी बैठक झाली. पण कोणतेच धोरण कार्यवाहीत आले नाही. कारण महावीर को.ऑप. सोसायटीमध्ये जागा सभेकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात वाद निर्माण झाल्याने सभेने या बोर्डिंगच्या स्थापनेकडे फारसे लक्ष्य दिले नाही. त्यानंतर जे. जे. मगदूम ट्रस्टने चालवलेल्या शै. संस्था यांना वसतिग्रहाची सोय झाल्याने १९९० च्या दशकामध्ये बोर्डिंग काढण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही.[६६]

## २) देवरूख जैन बोर्डिंग देवरूख :

देवरूख हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध गाव. यांच्या जवळचे खारेपाटण जैन ऐतिहासिक परंपरा असलेले कोकणातील बंदर येथे श्री मांगले बंधू यांनी जैन उन्नती मंडळ स्थापन करून त्यातर्फे एक बोर्डिंग हाऊस चालू केले पण काही कारणाने ते बंद पडले. तेव्हा त्यांच्या मालकीसहीत हे बोर्डिंग जैन सभेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला. १९८२-८३ साली द. भारत जैन सभेने वेगवेगळ्या दानातून या बोर्डिंगसाठी पैसा उभारून देवरूख बोर्डिंग ताब्यात ठरविले. पण तेथील मॅनेंजमेंटवर लक्ष न ठेवल्याने पैशाची मागणी वाटत राहिली त्यामुळे आर्थिक दृष्टीने लांब अंतरावर असलेल्या या बोर्डिंगचा कार्यभार सांभाळणे अशक्य झाल्याने हे बोर्डिंग बंद पडले.[६७]

असेच प्रयत्न इस्लामपूर, निपाणी तसेच कर्नाटकातील तेरदाळ, जमखंडी याठिकाणीही झाले. परंतु सभेचा वाढलेला व्याप कार्यकर्त्यांना मिळणारा वेळ आणि प्रत्यक्ष कार्यवाही यामधील अंतर यामुळे जैन बोर्डिंग स्थापन करण्याच्या मागण्या पूर्णत्वाला गेल्या नाहीत.[६८]

## संदर्भ सूची :


१) डॉ. संगवे, राजर्षी शाहूस्मारक ग्रंथ, स. डॉ. जयसिंगराव पवार, कोल्हापूर, २००१, पृ. ५९५.

२) सूर्यवंशी कृ. गो., उपरोक्त, पृ. १४१.

३) श्री. मूडबिद्रीकर बा. शा., उपरोक्त, पृ. ५

४) डॉ. विलास संगवे, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, पृ. ८१.

५) श्री जिनविजय, १९०५; डॉ. विलास संगवे, उपरोक्त, ९८-१०२.

६) लठ्ठे ए.बी., छत्रपती शाहू महाराजांचे चरित्र, पृ. १५०.

७) डॉ. पद्मजा पाटील, पीएच.डी., पृ. ६०.

८) कोल्हापूर स्टेट ॲडमिनस्ट्रेटीव्ह रिपोर्ट, १९०५-०६, पृ. ५७.

९) दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूरमधील प्रोसिडिंग्ज, १९०४-०७.

१०) ब्र. शितल प्रसादजी 'दानवीर माणिकचंद' हिंदी, सूरत, १९१९, पृ. ५८२, दक्षिण भारत जैन सा‍ा हिरकमहोत्सव स्मरणिका, उपरोक्त पृ. ६.

११) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, १९७६-२०००.

१२) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १०७-१०८.

१३) डॉ. पद्मजा पाटील, उपरोक्त पृ. २१३.

१४) कित्ता, पृ. १२२-२३.

१५) श्री जिनविजय, डिसेंबर १९०९.

१६) कोल्हापूर स्टेट ॲडमिनीस्ट्रेटीव्ह रिपोर्ट, १९१२-१३, पृ. ५६.

१७) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. ९.

१८) कित्ता, पृ. ९-१०.

१९) कृतिशील सेवाव्रती तात्या पाटील, उपरोक्त, पृ. १९२.

२०) प्रगती आणि जिनविजय १/८/१९८८.

२१) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा (१९७६-२०००) पृ. २२.

२२) प्रगती आणि जिनविजय २८/९/१९९७.

२३) प्रगती आणि जिनविजय ३/६/१९८८.

२४) दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर विद्यार्थी रजिस्टर, १९८६-२००४.

२५) कोल्हापूर स्टेट ॲडमिनीस्ट्रेटीव्ह रिपोर्ट, १९०६-०९, पृ. ५६.

२६) डॉ. पद्मजा पाटील उपरोक्त, पृ. ७७.

२७) कित्ता, पृ. ७७-७८.

२८) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९८५-२००४.

२९) प्रगती आणि जिनविजय, २८ नोव्हे. १९६०.

३०) डॉ. संगवे, उपरोक्त, पृ. ८८.

३१) प्रगती आणि जिनविजय, १९९३, पृ. १५-१७. (कन्नड)

३२) डॉ. संगवे, उपरोक्त, पृ. १५९.

३३) कित्ता, पृ. १६०.

३४) डॉ. पद्मजा पाटील, द. भा. जैन सभा, १९७६-२०००.

३५) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९४९-५०.

३६) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९५०-५८.

३७) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९६४-६५.

३८) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९७६-७७.

३९) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, ३१/१२/१९८४.

४०) हुबळी जैन बोर्डींग विद्यार्थी रजिस्टर, १९८१-२००५.

४१) धर्मविजय, शतमानोत्सव स्मरण पत्रिका, माणिकबाग दिगंबर जैन बोर्डींग बेळगाव, १०/१०/२००३, पृ. ५३.

४२) कित्ता, पृ. ५५.

४३) डॉ. विलास संगवे, उपरोक्त १६३-६४.

४४) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९५०.

४५) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६-२०००) पृ. १८५

४६) कित्ता, पृ. १८६

४७) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९४९-२०००

४८) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १६६.

४९) कित्ता, पृ. १६७-६८.

५०) प्रा. श्रीधर हेरवाडे, कृतिशील तात्या पाटणे, उपरोक्त, पृ. २१०.

५१) कित्ता

५२) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १७४.

५३) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९४४-४५.

५४) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९४९-५०

५५) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९५३.

५६) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९६४-६५/१९७६-७७.

५७) रा.ध.दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली, रजिस्टर पत्रक, १९८४-२००६.

५८) डॉ. संघवे, उपरोक्त, पृ. १८२.

५९) प्रा. श्रीधर हेरवाडे, कृतिशील सेवाव्रती तात्या पाटणे, पृ. २११.

६०) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९८८.

६१) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९९२.

६२) श्री माणगावे सर यांची मुलाखत, २०/३/२००६.

६३) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, १९७६-२०००, पृ. २००

६४) श्री माणगावे सर यांची मुलाखत, २०/३/२००६.

६५) दक्षिण भारत जैन सभेचे वार्षिक अहवाल, १९८६-२००१.

६६) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, १९७६-२०००, पृ. २१०

६७) कित्ता, पृ. २१७

६८) कित्ता, पृ. २२२.